(सुनीलकुमार लवटे यांच्या निवडक कविता)

# हाताची घडी तोंडावर बोट



संपादक : रफीक सूरज

सुनीलकुमार लवटे यांच्या निवडक कविता

# हाताची घडी तोंडावर बोट

अक्षर

संपादक
रफीक सूरज

**हाताची घडी तोंडावर बोट**
(सुनीलकुमार लवटे यांच्या निवडक कविता)
**संपादक : रफीक सूरज**

**प्रथम आवृत्ती**
९ ऑक्टोबर २०२२

**रफीक सूरज**
३८, शांतीनगर, हुपरी
जि. कोल्हापूर- ४१६२०३
मो. ९४२२४२७५०१

**प्रकाशक**
**अक्षर दालन,**
२१४१, बी वॉर्ड, मंगळवार पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२६४६४२४
email- akshardalan@yahoo.com

**मुखपृष्ठ**
गौरीश सोनार

**रेखाचित्रे**
विमा सुरंगे

**अक्षर जुळणी**
सौ. शिल्पा पराग कुलकर्णी

**मुद्रक**
भारती प्रेस, कोल्हापूर

**मूल्य ₹ २५०/-**

## ‘वात्सल्याच्या वृक्षछायेत सनाथपणाची प्रार्थना’

वेगवेगळ्या सामाजिक चळवळीत कार्यकर्ता म्हणून सक्रिय असणारे, पुरोगामी विचारसरणीचे पुरस्कर्ते, हिंदी विषयाचे मान्यवर प्राध्यापक, अनुवादक, उत्तम प्रशासक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, संपादक, साहित्यिक असे व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू असणारे डॉ. सुनीलकुमार लवटे हे एक बहुआयामी आणि बहुरंगी व्यक्तिमत्त्व आहे. तीव्र सामाजिक भान असलेले आणि सामाजिक परिवर्तनासाठी कृतिसातत्याचा अविरत आग्रह धरणारे संवेदनशील मन त्यांच्या लेखनात ठळकपणे बघायला मिळते. ‘खाली जमीन वर आकाश’ या बहुचर्चित आत्मकथनाबरोबरच लंवटे यांनी वैचारिक, समीक्षा, ललित आणि कविता अशा विविध साहित्यप्रकारात वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे. लवटे यांची ओळख मुख्यत्वे करून कवी म्हणून नसली तरी, त्यांच्या लेखनाची सुरुवातच मुळी कवितालेखनाने झाली आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

लवटे यांची ‘बालमंदिर’ ही वयाच्या चौदाव्या वर्षी लिहिलेली पहिली पहिली कविता नववीत असताना शाळेच्या ‘धडपड’ या हस्तलिखित भित्तीपत्रिकेत १९६४ साली प्रकाशित झाली. ही कविता आता उपलब्ध नाही. पुढे गारगोटी येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना लवटे यांच्या काव्यलेखनास नवे धुमारे पुटके. तारुण्याच्या विशीच्या टप्प्यावर लिहिलेल्या या कवितांतून स्वाभाविकपणे प्रेमजाणीव प्रकटली आहे.

**प्रेमास माझ्या**
**जोड तुझ्या नकाराची**
**सदैव की क्षणिक**
**कळेना कधीची**

(न सुटणारे गणित)

यासारखे या कवितेत स्वप्नाळू कातर मनाले आणि नवथर, नितळ, कोवळ्या प्रेमानुभवांचे स्पर्श, त्याचे चटके व व्यथा प्रकट झाल्या आहेत. प्रेमभावनेचा प्रांजह, निखळ व प्रसन्न आविष्काराचा मार्ग पुढेही त्यांच्या कवितेत वेगवेगळी वळणे घेत ठळक होत गेला आहे. प्रेमभावनेच्या आत्मतृप्तीची अनेक विलोभनीय अशी चित्रे त्यांच्या कवितेत साकार झाली, अशा कवितांचा परामर्श पुढे आपण घेणार आहोतच.

सुनीलकुमार लवटे यांचा सरल्या ऋतुचं वास्तव संग्रहाच्या कवितासंग्रह २०१२ साली प्रकाशित झाला. या संग्रहाच्या प्रथम आवृत्तीत एकूण ५७ कविता संग्रहित होत्या. दुसऱ्या सुधारित आवृत्तीत पुन्हा नव्याने २० कवितांची भर टाकण्यात आली. त्यामुळे संग्रहातील कवितांची एकूण संख्या ७७ झाली. या संग्रहाशिवाय लवटे यांच्या ५०-६० कविता अजूनही असंग्रहित आहेत. लवटे यांनी मराठी कवितेबरोबरच हिंदी आणि इंग्रजीतूनही काही कवितांचे लेखन आहे. या कविताही अजून वाचकांसमोर आलेल्या नाहीत. एकंदरीत १९६४ ते आजअखेर, साधारणपणे पाच-सहा दशकांच्या अशा मोठ्या कालखंडात लवटे यांच्या कवितांची एकूण संख्या दीडशेच्या आसपास भरते. लवटे यांनी भिन्न साहित्यप्रकार हाताळले असले तरी, काव्यत्मकता हा त्यांच्या लेखनाचा आत्मधर्म आहे असे म्हणता येते. या वैशिष्ट्यामुळे त्यांचे सर्व साहित्य स्वतःचा एक सवतासुभा राखून आहे असे सहजपणे जाणवते.

'हाताची घडी तोंडावर बोट' हे सुनीलकुमार लवटे यांच्या निवडक ५६ कवितांचे संकलन आहे. लवटे यांचा जन्म आणि बालपण इतर सर्वसामान्य मुलांपेक्षा वेगळ्या पर्यावरणात व्यतीत झाले आहे. अनाथाश्रम आणि रिमांड होममधील 'हाताची घडी तोंडावर बोट' अशा 'मोकळेपणा' हिरावून घेणाऱ्या दबावव्यवस्थेत त्यांच्या भावविश्वाची जडणघडण झाली आहे. 'अनाथ' म्हणून तिरस्कार, घृणा, अपमा याबरोबर एक प्रकारच्या उपकाराचे ओझे कायम यांच्या वाट्याला येत गेले. त्यामुळे भय, कुंभा, संकोच या भावभावना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनत गेल्या. अर्थातच हे त्यांच्या कवितेतही पतिबिंबित झाले आहे. मोकळपणाने अभिव्यक्त होण्यातली ही घुसमट त्यांच्या कवितेत अनेक ठिकाणी बघायला मिळते.

प्रत्येक कवीचे व्यक्तिमत्त्व वेगळे असते. त्याबरोबरच भावविश्वही वेगळे असते. अनुभव घेण्याची रीतही वेगळी असते. लवटे यांच्या कवितेत त्यांचे स्वतःचे असे खास अनुभवविश्व साकार झाले आहे. त्यांचे अनुभवविश्व हे बहुकेंद्री आहे. जीवनाच्या विविध अंगांवर आणि भिन्न भिन्न प्रकृतीच्या विषयांवर त्यांनी कविता लिहिली आहे. सुरुवातीच्या टप्प्यावरील त्यांच्या कवितेत एक ऋजू आणि संवेदनशील मनात उत्पन्न झालेली प्रेमभावनेची विविध रूपे प्रकटली आहेत. पण हळूहळू भावस्पर्शी स्वप्नाळू कल्पनाविश्वाची कास सोडून त्यांच्या कवितेत सामाजिक जाणीव अधिक तीव्र होत गेली. एकंदरीत जगण्यातील टक्केटोणपे खात, व्यवहारी कधी हात करीत, त्यातून अंगात भिनत गेलेल्या समजूतदारपणाचे भान नंतरच्या कवितेत अधिक ठळकपणे संवेदय होत गेले आहे. उत्तराधीत लिहिल्या गेलेल्या या कवितेतला 'मी' स्वतःच्या आणि माणसाच्या एकंदर जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो आहे. स्वतःच्या भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींचा अर्थ लावील तो विचार-चिंतन मांडतो आहे. हे अर्थरूप जीवनचिंतन म्हणजे एक उसठशीत चिंतनात्मक अनुभवच. हे जीवनार्थाचे चिंतन 'अंतर्मनात पिंगा घालणारे 'हेड एंड' असलेले रस्ते,' 'आताशा मी बिया खोबायच्याच सोडलंय', 'माणूस म्हणजे एक गोची', 'माणसांचा मुडदुस', 'मी बेटावर एकटाच उभा, 'मोनोपॉजनंतरचा बहर', 'एकल्यांकडून एकाकडे', 'नरपुंगवाचा तो आत्ममग्न घोंगाव', 'वर्तमानाचे संकीर्ण वळण', 'मी या काळात नाही', 'मी कर्फ्यू पुकारलाय माझ्याभोवती' आदी शब्दसमुर किंवा प्रतिमांच्या आश्रयाने काव्यरूप धारण करते. या कवितेतला 'मी' स्वतःच्या आयुष्याकडे पाहतो, तेव्हा त्या पाहण्याला इतरांच्याही जगण्याचा संदर्भ असतो. हा 'मी' समष्टीला सामावून घेणारा, समष्टीपासून अलग होऊ न शकणारा असा आहे. या 'मी'ला सातत्याने या ना त्या रूपातला बालरूपातला बाह्य वास्तवाचा संदर्भ असल्यामुळे त्याला एकप्रकारची वैशिष्ट्यपूर्ण घनता प्राप्त झाली आहे.

२.

सुनीलकुमार लवटे यांच्या कवितेत दुःखाची विविध रूपे जागोजागी विखुरलेली आहेत. एका बाजूला कवी दुःखाने भारलेल्या समूहाचा एक भाग आहे. तर दुसऱ्या बाजूने तो या समूहाशी एकवटलेलाही आहे. त्यामुळे ही कविता निव्वळ 'एकल्याची' न राहता अनेक पातळ्यांवर

तिच्यातून समूहाचा कोलाहल ऐकायला येत राहतो. मानवी जीवनातील भयग्रस्तता, खोटारडेपणा, स्वार्थीपणा, जात-धर्म-कुळ-गोत्र-लिंग अशा गोष्टींच्या आधारे केले जाणारे भेदाभेद, सांस्कृतिक दहशतवाद, सर्वसामान्य माणूस, स्त्रिया, लहान मुले, अपंग याबरोबरच वंचित समुहाचे होणारे शोषण अशा अनेक गोष्टींमुळे वर्तमान वास्तव चिरफाळून गेले आहे. अशा वास्तवाकडे दुर्लस करून खऱ्या संवेदनशील माणसाला तटस्थ राहताच येत नाही. एका बाजूला जाणवणारी स्वतःची दुर्बलता-अगतिकता आणि दुसऱ्या बाजूला डोळ्यांदेखत होणारे शोषण-अन्याय यातून नेमकी निश्चित भूमिका कशी घ्यायची याविषयी त्याच्या मनाची अस्वस्थता वाढत जाते-

'**माझी तक्रार या सर्व असामाजिक तत्त्वाविरुद्ध आहे**
**जे आपट्यांची पानं विकून**
**सोन्याचा धंदा करतात**'

(माझी तक्रार)

अशाप्रकारची सभोवतालच्या ढोंगी जगण्याविषयीची खंत तो बोलून दाखवितो. अन्याय, अत्याचारी, शोषक आणि दांभिक अशा व्यवस्थेच्या विरोधात कवीने स्पष्ट भूमिका घेतली आहे. लवटे यांच्या कवितेत मानव मुक्तीसाठी माणसाला केंद्रस्थानी ठेवू पाहणारे मूल्य बसायला मिळते. त्याबरोबरच संघर्षाची एक जोरकस भावनाही प्रकट होताना दिसते. 'अत्याचार करणाऱ्यापेक्षा तो सहन करणाराही अपराधी' (हत्ती आगि मुंगीची गोष्ट) असा या संघर्षामागचा विचार आहे. अर्थात कवीची वैचारिक भूमिका पक्की करणारे गांधी-आंबेडकर तत्त्वज्ञानाचे भक्कम अधिष्ठानही त्यामागे आहे.

कवी लवटे यांचा जन्म आणि बालपण इतर सर्वसामान्य मुलाप्रमाणे व्यतीत झालेले नाही. नाव, गाव, आई, वडील, नातेवाईक, जात, धर्म, कुल, गोत्र अशा अस्तित्वाच्या आणि परिचयाच्या कोणत्याच पारंपरिक खुणा नसलेले वेदनादायी असे आयुष्य त्यांच्या वाट्याला आले. अनाथाश्रम, रिमांड होममध्ये वाढलेल्या, शिकलेल्या आणि स्वतःला सावरून घेतलेल्या लवटेंना बालपणात सतत उपेक्षा आणि हेटाळणी यांना सामोरे जावे लागले. 'खाली जमीन वर आकाश' या मनोगतात लवटे म्हणतात- 'अडगळीत इतस्ततः विखुरलेल्या आठवणी

मी मोठ्या हिमतीने गोळा करतो. तेव्हा हाती येतं बालपण. मोठं विलक्षण होतं ते. माझं लहानपण 'मुंगी साखरेचा रवा' नव्हतं. 'अहा ते सुंदर दिन हरपले' अशी हुरहुर लावणारंही ते खचितच नव्हतं. उलटपक्षी 'बीत गई सो बात गई' असा 'सुटकेचा निःश्वास' होतं ते! माझं बालपण छोटा प्रश्नांचं मोठं काहूर होतं. कधीकाळी तुम्हाला मधाळ वाटणाऱ्या प्रश्नांनी मात्र माझ्या मनात जीवनमोहक उठवलं होतं. माझं बालपण प्रश्नग्रस्त होतं. लहानपणी मला प्रश्नांची विलक्षण ॲलर्जी होती. छोटे प्रश्न मोठा थरकाप उडवायचे. तसे ते प्रश्न काही यक्षप्रश्न नव्हते. साधे, सोपे, सहल प्रश्न... तुझं नाव काय? तुझे आई-वडील? गाव कुठलं? तू कुणापैकी? तुझ्या ओळखीचं कोणी आहे? तुम्ही विश्वास ठेवा अथवा ठेवू नका, पण या प्रश्नांची उत्तरे माझ्याकडे त्यावेळी नसायची. प्रश्नकर्ते मला निरुत्तर पाहून अचंबित व्हायचे. मी मात्र गोंधळलेला, गांगरलेला असायचो... अनाथाश्रमात वाढलेला मी... माझ्या फायलीत माणूसपणाचा मागमूसही नव्हता. मी होतो मात्र पुरुषजातीचा एक क्षुल्लक जीन... म्हणून माझं नावही नव्हतं. होता कोर्टाचा वॉरंट नंबर... मी फायलीनुसार एक 'Name Not Known (NNK)' होतो. माझं माणुसपण मुळातच नाकारणाऱ्या या समाजानं माझं वयही एक्स-रे मशिनने निश्चित केलं होतं.

लवटे यांच्या दुःखदायी जन्माची आणि बालपणाची कथा समजून घेताना मराठीतील आणखीन एक मातब्बर कवी नारायण सुर्वे यांची आठवण हमखास होते. सुर्वे यांच्या वाट्यालाही अशाप्रकारचे वेदनादायी 'अनाथ' पण आले होते. आपल्या या आयुष्याविषयी सुर्वे यांनी 'माझे विद्यापीठ' या कवितेत म्हटले आहेच.

'ना घर होते, ना गणगोत, चालेन, तेवढी पायाखालची जमीन होती दुकानांचे आडोसे होते; मोफत नगरपालिकेची फुटपाथ खुलीच होती' सुर्वे यांना ना स्वतःचे घर ना दार. ना आईबाप ना नातलग. आपल्या दृष्टीने ते तसे पोरके, एकाकी आणि निराधार. पण सुर्वे यांच्याबाबतीत एक गोष्ट त्यातल्या त्यात बरी झाली, त्यांना गंगाराम सुर्वे या सहृदयी माणसाने छातीशी धरले. बापाच्या ठिकाणी स्वतःचे नाव दिले. या निराधार मुलाचा सांभाळ करून त्याला मोलाचा आधार दिला. त्यामुळे सुर्वे यांना बाकी नाही मिळाले तरी चालण्यापुरती का

असेना जमिनीचा आधार मिळाला. यापेक्षा लवटे यांच्याबाबतीतली परिस्थिती थोडीशी वेगळी आहे. त्यांना मोकळेपणाने चालणं तर सोडाच तुरुंगातल्या कैद्याप्रमाणे रिमांड होम चा कोंडवाडा वाट्याला आला. अनाथाश्रम आणि रिमांड होममधील नरकाप्रत जीवन लवटे 'खाली जमीन वर आकाश'मध्ये रेखाटले आहेच. अगदी कोवळ्या वयात कुठेही वावरताना 'हाताची घडी तोंडावर बोट' अशा पद्धतीने कायम दबावाखाली वावरावे लागले. तेथील झोपणंही सक्तीचं आणि विचित्र होतं. 'एक, दोन, साडेऽ माडेऽऽ तीन' म्हटलं की डोके मिटायचे, हालचाल एकदम बंद. नाहीतर छडी बसलीच असे समजायचे. अशा नको इतक्या अघोरी सैनिकीकरणाच्या दबावामुळे बालपण करपून गेले. पुन्हा समाजाकडून अवहेलना, अपमान, अविश्वास आणि नाकारले गेल्याची कडवट भावना होतीच. पण लवटे यांचे मोठेपण असे की त्यांनी ही कडवट जाणीव ओतप्रोत पचवली. आपले स्वतःचे वेगळेपण त्या नाकारलेल्या जीवनातही टिकवून ठेवण्यात कमालीचा संयम दाखविला.

**'जगणे माझे होते**
**संघर्ष ठायी-ठायी**
**संघर्ष माझा माझ्याशील होता**
**मीच निर्मिलेल्या विवेकशी**

**साथसंगत निभावत गेलो**
**प्रत्येक पाऊल उचलत राहिलो**
**जो देगा उसका भला**
**न देगा उसका भी '**

(नवे जागतिकीकरण)

अशाप्रकारे तिरस्काराच्या दलदलीत वाढूनही स्वतःच्या दैनंदिन व्यवहारात लवटे कुठेरी घृणा प्रकट करीत नाहीत. जन्माला घालून सोडून जाणाऱ्या आईपासून हरघडी भेटलेल्या प्रत्येकाकडे ते करुणेने बघतात. नारायण सुर्वे यांनीही आपल्या कवितेत 'माणसासारखा यश सृजनात्मा मला भेटलाच नाही' अशाप्रकारची माणसाबद्दलची आत्यंतीक ओढ मांडली आहे. लवटे यांच्या कवितेल प्रकटणारी करुणा सुर्वे यांच्या कवितेशी नाते सांगते.

३.

लवटे यांच्या सामाजिक जाणिवेचा स्त्रोत समाजाच्या भिन्न भिन्न पातळ्यांवरून वाहताना दिसतो. समकालीन जीवनातील कुरूपता, क्षुद्रता व्यक्तिजीवनातील आणि समूहजीवनालीक अंतर्विरोध, विसंगती हे लवटे यांच्या अनुभूतीचे मुख्य आशयसूने आहेत. जगण्याच्या लढाईत 'परिस्थितीचं कंपल्शन' घेऊन झगडताना माणसाच्या वाट्याला असमाधान, असुरक्षितला आणि अशांतता येते आहे. जीवनाला आलेली उदासीनता व उद्ध्वस्त मनाची अवस्था 'मी कर्फ्यू पुकारलाय माझ्याभोवती', 'मी अनाथ, तू सनाथ', 'मी या काळात नाही', 'न उमेरणार अंधार', 'माणसं बदलतात', 'स्थितपूर्ण' अशा काही कवितांतून बघायला मिळते. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या क्रूर अधिसत्तेच्या भयसूचक दर्शनही या कवितांतून झाले आहे. संस्कृतीच्या अस्तित्वाचे व सार्वभौमत्वाचे प्रश्न आमच्या वर्तमानात ऐरणीवर आले आहेत. अशा या बदललेल्या सामाजिक वास्तवाच्या दडपणाचा सामना कसा करायचा हा पेच आज सर्वसामान्य माणसासमोर आहे. नव्या वर्तमानाला प्रतिक्रिया कशी द्यायली, हा प्रश्न आजच्या कवींसमोर आहे. हा पेच मांडताना लवटे यांनी मोबाईलमधील इमोजीची प्रतिमा आहे.

**'फार स्पष्ट व्हायचं तर**
**इमोजीतूनच!**
**म्हणजे असून नसल्यासारखं**
**आणि नसून असल्यासारखंच'**

(मी कर्फ्यू पुकारलाय माझ्याभोवती)

आज प्रत्येक व्यक्तीशी जोडल्या गेलेल्या 'मोबाईल' या आधुनिक यंत्राशी संबंधित इमोजी, सेल्फी, चॅटस्, डिपी अशा काही प्रतिभांचा वापर कवीने प्रत्ययकारीपणे केला आहे. नावीन्य, संवेदना संपृक्तता आणि आवाहकता या वैशिष्ट्यांमुळे या प्रतिमा अर्थपूर्ण ठरल्या आहेत.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आजच्या माणसासमोरील वास्तव त्याच्या अपेक्षेपेक्षाही अधिक वेगाने-झपाट्याने बदलते आहे. या बदलांविषयी कोणती नैतिक भूमिका घ्यायची हा संभ्रम एका बाजूला सर्वांनाच सतावतो आहे. तर दुसऱ्या बाजूला चालू वर्तमानात कोणतीही नैतिक भूमिका संभवत नाही, अशीही एक अधिक सोयीची भूमिका घेतली जाते. थोडक्यात काय तर नागतिकीकरणानंतरचे जीवन हे

अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. अशा काळात मानवी मूल्ये टिकून राहतील अशी भाबडी आशा कवीला वाटते.

**उद्याच्या जगात**
**माणूसपणाचा धर्म जागेल तेव्हा**
**जात, धर्म, वंश, कुल, गोत्र नसेल**

**फक्त माणूस आणि माणूस**
**तेच नव्या काळाचं**
**नवं जागतिकीकरण असेल**
**अन् नवं उदारीकरणही**
**स्वार्थी खासगीकरणाला बगल देणारं!**

(नवे जागतिकीकरण)

अशी भाबडी असली तरी आशा लावून धरण्यामागे कळवळणारे मानवतावादी अंतःकरण हे लक्षात येते. पण लवटे यांच्या कवितेचे स्वरूप अनेकदा त्रुटित अशा जीवनदर्शनाचे असल्याचे जाणवत राहते हेही इथे स्पष्टपणे नोंदवायला हवे. एखादा चमकदार विचार त्यांच्या कवितेत डोकावतो, पण त्या विकाराला पुरेशी खोली मिळत नाही. आविष्काराच्या दृष्टीनेही पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. त्यामुळे समृद्ध अनुभव असूनही तो नीटपणे थाटला न गेल्यामुळे अनुभवाचा संदर्भ वाढताना दिसत नाही. याचा एकूण परिणाम अनेकदा ही कविता एक बोथट गद्य विधान होण्यात झाला आहे.

४.

भोवतालच्या गर्दीतील माणसांचे माणूसपण शोधण्याची सुनीलकुमार लवटे यांना ध्यास दिसतो. त्याबरोबरच त्यांची स्त्री-पुरुषातील दृढ प्रेमभावावर श्रद्धा आहे. स्त्री-पुरुष प्रीतीची, सहजीवनाची, परस्पर सामंजस्याची अनेक रूपे त्यांच्या कवितेत बघायला मिळतात. सांच्या कवितेत प्रकट झालेल्या बहुतांशी स्त्रिया पत्नी, प्रेयसी, मुलगी, आई, बहीण असे नातेसंबंध घेऊन फारशा प्रकटत नाहीत. त्यापेक्षा ती 'स्त्री' आहे व तिच्याशी 'मानवी भावाने' कवीचे नाते जुळून आले आहे या व्यापक पातळीवरून हे चित्रण येते.

**'पूर्वी गवत, गोवऱ्या दिसल्या की**
**तुझ्या सहवासातील गुलाबी थंडी**

**कुडकुडायची**
**आज सरण आठवतं नि स्मशान!**
**केसांचं रंगान्तर**
**माझं वेशांतर नि स्थित्यंतरही अनेक!**
**हेच कां ग असतं आयुष्याचं भाषांतर?**

(खूणगाठ)

भोवतालच्या सामाजिक जाणिवेचं प्रतिबिंब अशाप्रकारे प्रेमभावनेतून प्रकट होते. खरे या कवितेत प्रकटणारी स्त्री ही कवीच्या दृष्टीने त्याला समजून घेणारी, जिच्याशी आपके खाजगीपण वाटून घ्यावे असे वाटणारी, पत्नी-प्रेयसी वगैरे नातेसंबंधांपेक्षा ती घनिष्ट मैत्रभाव जपणारी अशी 'सखी' आहे. तिच्याशी प्रकट केलेला प्रेमभाव कवीला जगण्यातल्या अनेक जाणिवांचे भाष्यच वाटते.

**'तू अशीच असावी रहावी**
**रहावी**
**बोलावी**
**हसावी**
**रुसावी**
**पण असावी'**

(तू)

यातील ती 'असावी' मधील 'असते'पणाला कवीने धरलेला आग्रह आणि तिची संवादोत्सुकता स्त्री-पुरुष यांच्यातील निर्भेळ व्यापक मानवी संबंध वास्तवात जगणे सुलभ करतील अशा धारणेतून पुढे आली आहे. उत्कट भावाच्या व मुग्ध प्रेमाच्या छटांचे भावसौंदर्य न्याहाळीत असतानाच लवटे स्त्रीच्या व्यक्तित्वाचा शोध घेत असतात आणि त्याचवेळी जीवनातील आपली मूल्यविषयक जाणीवही धीटपणे तपासून पाहत असतात. म्हणूनच

**'मैत्रीचं गारूड उमजायचं तर**
**यावं लागतं कवच फोडून बाहेर**
**नि कोशमुक्त व्हावं लागलं अंत:प्रेरणेन**
**उभे-आडने, उलटे-सुलटे,**
**सरळ वाकडेही**
**धागे सोडवावे लागतात अलगद**

**स्वहस्ते हस्तक्षेपाशिवाय**
**ते सोपं नसतं गुणगुणण्याइतक...**

(जीवनगाणं)

असा प्रेमासंबंधीचा अतिशय वास्तववादी, व्यवहारी आणि विवेकी दृष्टिकोन कवीने प्रकट केला आहे. या कवितेतील स्त्री-पुरुष नाते परस्परांचा राग, द्वेष, तिरस्कार समजून घेणारे आणि व्यापक मानवप्रेमाची बांधीलकी स्वीकारणारे आहे. त्यामुळे लवटे यांची प्रेमकविता ही वेगळी ठरते. सुखद अनुभव देणारी वस्तू म्हणून स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन टाळून लवटे हे स्त्रीकडे केवळ एक माणूस म्हणून पाहतात, हे त्यांच्या कवितेचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

वरवर सुखी असणारा, पण आतून पोळलेला असा मध्यमवर्गीय संवेदनशीलतेचा नायक लवटे यांच्या प्रेमकवितोत वारंवार डोकावतो-

'**रक्त साकाळलेलं**
**हृदय विदीर्ण विस्तीर्ण**
**मी असा एकटा, अनाथ**
**तू मात्र नाथ सनाथ**'

(मी अनाथ, तू सनाथ)

भग्न प्रीतीच्या जखमेपासून, जगण्यातून कृतार्थतेच्या होणाऱ्या साक्षात्कारापर्यंत सुनीलकुमार लवटे यांच्या प्रेमकवितेने अनेक वळणे घेत प्रवास केलेला दिसून येतो. कथनात्मक, भावकाव्यात्मक आणि चिंतनात्मक अशा तिहेरी विणीतून प्रेमकविता आकार घेताना दिसतात.

'**प्रेम म्हणजे केवळ शरीर**
**हे अज्ञानच एकप्रकारचं**
**प्रेम त्या पलीकडची,**
**एक मनस्वी अस्वस्थता असते खरी!**'

(जीवनगाणं)

अशी अशारीर (प्लेटॉनिक लव्ह) प्रेमाची संकल्पना कवी अधोरेखित करण्याचा प्रयत्न करतो. कवी स्त्री शरीर सौंदर्याला अग्रस्थान देत नाही, तर तो तिच्या मनाला आणि भावना सौंदर्याला महत्त्व देतो. प्रेमभावनेकडे पाहण्याचा एकप्रकारचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन या कवितेत प्रकट झाला आहे. इथे कवितेतून व्यक्त होणारा प्रेमानुभव कवीच्या व्यक्तिगत

अनुभवातूनच निर्माण झालेला आहे असे मानण्याचेही काही कारण नाही. प्रेमानुभवाच्या अर्थपूर्णतेचा शोध घेत असताना कवी आपली कठोर सामाजिक वास्तवाची जाणीव आणि विश्ववास्तवाचा ठाव घेण्याची तहान विसरत नाही हे अधिक महत्त्वाचे.

५.

लवटे यांच्या अनेक कविता दीर्घ वळणाच्या आहेत. 'आधार', 'नको भेटणे तर...','सेल्फी', 'मी कर्फ्य पुकारलाय माझ्याभोवती', 'हत्ती आणि मुंगीची गोष्ट', 'रस्ते', 'झाड नि माणूस', 'माणसं बदलतात', 'रस्ते होणाऽऽर' स्थितसप्रज्ञ इत्यादी कवितांचा यासंदर्भात उल्लेख करता येईल. सुरुवातीच्या टप्प्यावर लिहिलेल्या कवितांमध्ये हे दीर्घत्व आढळत नाही. कवी हा काव्यविषयाकडे चिंतनशीलतेने विचारविश्लेषणाच्या दृष्टीने पाहात असल्यामुळे या कवितांना दीर्घत्व प्राप्त गेले आहे. वाढत्या वयामुळे आणि अनुभव संपन्नतेतून कवीची अंतर्मुख होऊन विचारविश्लेषण करण्याची दृष्टी रुंदावत गेली आणि त्याचे परिणती कवीच्या नंतरच्या काळातील कविता दीर्घ होण्यास झाली. कवीने घेतलेले विविध जीवनानुभव हे वैयक्तिक पातळीवरील न राहता, त्यांना सामूहिकता प्राप्त होते. एका वेगळ्या पातळीवर त्यांचे सामान्यीकरण होते.

आपल्या सभोवताल उग्र रूप धारण करणाऱ्या समाजवास्तवाला व वेगाने होत असलेल्या मुल्यऱ्हासाला कवी पाहतो, तेव्हा कवितेतून आपला आक्षेप नोंदवितो. हा आक्षेप नोंदविताना कवीचा आवाज कदाचित क्षीण असेल पण एकूण सामाजिक अभिसरणात स्वतःचा हस्तक्षेप नोंदविणे ही फार मोठी गोष्ट तो करू पाहतो. 'तत्त्व आणि तिलांजली' 'स्थितप्रज्ञ' 'एफ. आय. आर.', 'हत्ती आणि मुंगीची गोष्ट' अशा कवितांत कवी स्वतःचे नाते समाजातल्या सर्वसामान्यांच्या यातनांशी जोडतो. दुःखतत्त्व मग समूर्त असो अथवा अमूर्त, ते सचेतन असो वा अचेतन त्याला समजून घेण्याचा व भिडण्याचा कसोशीने प्रयत्न करतो. 'रस्ते होणाऽऽर' आणि 'हत्ती आणि मुंगीची गोष्ट' या कवितात प्रकटलेला उपरोधाना स्वर कवितेच्या परिणामकारकतेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातो. आजूबाजूची व्यवस्था नीट जगू देत

नाही, ती अनेक पातळ्यांवर शोषण करते, स्वतःचे विचार करण्याची शक्ती छिनून घेते. जगण्याच्या रहाटगाडग्यात आपल्या व्यक्तित्वाला अवकळा व क्षुद्रत्वाची मर्यादा पडूनही कवी प्रस्थापित व्यवस्थेच्या बेकायदेशीर गोष्टींना विरोध करीत राहतो. त्याचा हा संघर्ष क्षीण स्वरूपाचा आणि कदाचित एकट्याचाच असू शकेल. त्याला इतरांची साथ नाही, पहा त्याची त्याने तमा बाळगलेली नाही.

**'मी बेटावर एकटाच उभा**
**स्थितप्रज्ञ आल्यापासून**
**पूर्वी बेटावर**
**एकटाच होतो**
**आता भर समुद्रातही एकटाच आहे**
**लाटा येऊन जातात तेव्हा**
**पायाखाली वाळू सरकते**
**तरी मी पाय रोवून घट्ट उभा**
**एकटा समुद्राच्या भरती-ओहोटी विरुद्ध!**

(स्थितप्रज्ञ)

एका संवेदनशील माणसाच्या मनःपटलावर वास्तवातील बारीकसारीक घटनांच्या क्रिया-प्रतिक्रियात्मक नोंदी तीव्रपणे उमटव जातात आणि हा माणूस एकाकी बनत जातो याचे सूचन कवीने केले आहे.

कवी सुनीलकुमार लवटे यांच्या कवितेत 'मृत्युजाणीव' हे आशयसूत्र अपवादात्मकसुद्धा बधायला मिळत नाही हे विशेषच म्हणायला हवे. सातत्याने जीवनसम्मुख वृत्तीने हा कवी प्रकटताना दिसतो. आपले जीवन समर्पित करण्याचा दृढ निश्चय कवीचा असल्याने तो मृत्युविषयी फारशी पर्वा करत नाही.

**'पासष्टाव्या वर्षी**
**चहाच्या रूपात**
**साखरेतून चुकून पडलेल्या**
**मुंगीलापण मी**
**उचलत असतो अलगद चमच्याने**
**मलाही असंच अभय द्यावं कुणीतरी**
**या स्वार्थाने'**

(भान)

अशाप्रकारे स्वतःला मुंगीच्या जीवनाशी जोडून घेऊन जीवनाच्या गोड असोशीला कवटाळण्याचा कवीचा हा प्रयत्न जगण्यातील सकारात्मकता दगोचर करतो.

पिंडाने कार्यकर्ते असणाऱ्या सुनीलकुमार लवटे यांच्या कवितेत दोन प्रकारच्या कविता दिसतात. एकीकडे सामूहिक शक्तीवर, मानवाच्या कर्तृत्वावर त्यांचा विश्वास ते प्रकट करतात. तर दुसऱ्या प्रकारच्या कवितेत ते स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु ही भूमिका अस्तित्वाला चाचपण्याची नसून तपासून पाहण्याची आहे. आपले विचार, आपल्या श्रद्धा-स्वप्ने यांची मांडणी करीत ते स्वतःचे पेच सोडविण्याचा प्रयत्न करतात. कवितेत स्वतः असणे ही या कवीची आत्मनिष्ठ वृत्ती आहे. तो स्वतःच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाबद्दल जिव्हाळा व्यक्त करतो. जगताना अनेक ठिकाणी आलेल्या अपयशाची प्रांजळ कबुली देतो. आयुष्यात किती तरी बऱ्यावाईट प्रसंगांशी तोंड द्यावे लागले असले तरी साच्या मनात कुणाविषयी अढी नाही. स्वतःतले सर्वच गुणदोष प्रांजळपणे स्वीकारण्याचा मोठेपणाही त्याच्याजवळ आहे.

लवटे यांनी आयुष्यभर साहित्यलेखनाबरोबरच वाचन संस्कृती टिकून राहण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. ग्रंथांशी मैत्री केली तरच जगण्याला संपन्नता प्राप्त होणार आहे याला कायम पाठपुरावा केला आहे. हेमिंग्वेचा There is no friend as loyal as book हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आवरणात जोपासला आहे. त्यांच्या 'वाचन' या ग्रंथात पुस्तकाची महती सांगणारे कवितासदृश लेखन प्रकाशित आहे. 'पुस्तकांच्या कविता' या कवितेत मानवी जीवनाचा अर्थ लावताना, त्याचे स्वरूप कसे आहे ते सांगताना त्यांनी पुस्तकाच्या प्रतिमेली योजना केली आहे. ही पुस्तक प्रतिभा जीवनार्थाची काव्यात्म प्रतिमा आहे.

'**पुस्तके गुंतागुंत असते**
**कधी सोडवणुकी**
**पुस्तके चकव्यूह**
**बाहेर पडणं**
**अशक्य**'

(पुस्तकांच्या कविता)

मानवी जीवनातील गुंतागुंत समजून घेताना कवीने पुस्तकांना चक्रव्यूहाशी कल्पकतेने जोडून घेतले आहे. 'चक्रव्यूह' नीटपणे भेदणे आणि त्यातून बाहेर पडणे हे ज्ञान फक्त पुस्तकांजवकच आहे. हे ज्ञान शंभर टक्के घेतले तर कुठल्याही संकटातून आपली सहीसलामत सुटका होईल. अर्धवट ज्ञान अडचणीत आणू शकते. वस्तुतः जीवनपुस्तकाची प्रतिभा जुनी व सांकेतिक आहे. परंतु कवीने तिचा वापर नावीन्यपूर्ण असांकेतिक रीतीने केलेला आहे.

**'पुस्तकं गातात**
**पुस्तकं हितगुज करतात**
**पुस्तकं समजावतात**
**पुस्तकं साथ-संगत, सोबत**
**सर्व सर्व करतात**
**म्हणून कधी कधी वटतं**
**जायचंच झालं कधी**
**पुस्तकांसोबत जावं**
**सरणाशेजारी देखील**
**रचली जावीत पुस्तकं'**

(पुस्तकांच्या कविता)

ग्रंथ हे माणसाच्या, समाजाच्या व संस्कृतीच्या घडणीत आणि विकासात महत्त्वपूर्ण काम करीत असतात. ग्रंथांशिवाय आयुष्याला अपूर्णता येईल, म्हणून ग्रंथसहवास जगण्याला जगण्याला बळकटी देणारा स्तोत्र असल्याचे कवी म्हणतो.

कवी लवटे यांची जडणघडण ज्या सामाजिक पर्यावरणात झाली, ते पर्यावरण आणि इतरांच्या वाट्याला येणारे पर्यावरण यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. ज्या वंचित अशा समुहात वावरले, मोठे झाले. त्याठिकाणी तथाकथित वाङ्मयीन परंपराच त्यांच्यासाठी उपलब्ध नव्हती. शालेय पाठ्यपुस्तकांची मिळतील ती पुस्तके सोडली तर ग्रंथांचा सहजस्पर्शही दुरापास्त म्हणावा असा. शालेय पाठ्यपुस्तकातील कथा-कविता वाचण्यापलीकडे त्यांच्यासाठी वेगळे काही वाङ्मयीन जग कुठले असणार? त्यामुळे 'वैचित' अशा समुहातून लिहित्या झालेल्या या कवीला आविष्कारासाठी खूपच मर्यादित अशी तंत्र-शैली परिमाणे समोर असणार म्हणूनच सुनीलकुमार लवटे यांच्या लेखनात प्रयोगशीलतेचा

फारसा आग्रह नाही. समोरच्याला विश्वासात घेऊन मनोगत व्यक्त करावे अशा सहज, साध्या, स्वाभाविक भाषेमध्ये कवी संवाद साधत राहतो. या कवितेची भाषा अनतंकृत आहे. कुठेही भाषेचा बोजडपणा अथा भरजरीपणा जाणवत नाही. काही कविता लांबीच्या दृष्टीने नको तितक्या दीर्घ होतात. तिच्यात तपशीलांची गर्दी जाणवत राहते. विशेषतः १९८० नंतरच्या हिंदीतल्या महत्त्वाच्या कवींच्या कवितेत ही गोष्ट बघायला मिळते. या कवितेच्या वाचनाचा प्रभाव लवटेंना स्वतःच्या काव्यलेखनात टाळता आलेला नाही असेही म्हणता येईल.

स्वतःशी आणि समाजाशी प्रामाणिक असलेली ही कविता समाज परिस्थितीचे वस्तुनिष्ठ चित्रण करते. मनातील सर्वप्रकारच्या कोवळीकीला, भावकोमलतेला आणि सौंदर्यप्रेमाला जपण्याला ती कसोशीने प्रयत्न करते. वंचितांच्या व स्त्रियांच्या दुःखाचे अनेक पदर ही कविता उलगडून दाखविते. आपल्या अवतीभोवतीचे सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण कसे ढासळतात चालले आहे आणि आपण कसे मूल्यविनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहोत याचे सुतोवाच ही कविता प्रभावीपणे मांडते. कविता हा जगण्याचा आरसा असून, जगणे आणि लिहिणे एकच ही या कवीची भूमिका आहे. तिरस्कार, घृणा, अपमान अशा दलदलीत आयुष्य करपून जाऊनसुद्धा जगण्यावर विलक्षण श्रद्धा ठेवणारी, साधीसोपी अशी देशी सामर्थ्य असलेली भाषा या कवितेतून प्रकट झाली आहे. जगाविषयी अपार करुणा आणि मानवतावादी भावना कवीच्या अंतःकरणात गच्च भरून आली आहे.

**'या वात्सल्य वृक्षाखाली,**
**होऊ दे, अनाथ सनाथ सारे**
**परिवर्तनाचे हे वारे**
**पेटवू देत धुमारे जगी सारे**

**अनाथ, निराधार, अनौरस सारी**
**उकिरड्यावरची लेकरे ही**
**उंबरठ्यावरी येऊ द्या**
**या वात्सल्य वृक्षाखाली**
**सनाथ त्यांना होऊ द्या!**

**- रफीक सूरज**



## अनुक्रमणिका


माझी तक्रार/२३, नवे जागतिकीकरण/२५, आधार/२८, मौन/३२ समपर्णाचं आसुसलेपण/३४, स्थितप्रज्ञ/३७, माणसं/४१, शहाणं जगण/४३, जनगणना - १/४५, ११ जनगणना - २/४८, माणसं बदलतात.../५१, मी या काळात नाही.../५५, मलाच न कळे/५७, मस्त अलम/५८, भान/६१, संकेत/६३, तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस.../६४, सरल्या ऋतुचं वास्तव/६६, सेल्फी/६८, ग्रहण/७०, अशी अचानक/७१, तुझ्या सहवासात.../७३, खूणगाठ/७४, तू भेटणारच नसशील तर.../७७, जीवनगाणं/७९, मी वाट पाहीन.../८३, नकार तरंग/८५, तू/८६, कळीची पहिली पाकळी/८८, नको भेटणे तर/९१, मी माझं एवढंच जग/३२, क्षणिका/९५, तुझ्या भोवती/९६, तू एकंदरीत झोपमोडच!/९७, दमदारांचे युग/९९, सावधान/१००, वृथा धाक/१०२, मोडता पाय/१०३, प्रकाशपुंजासाठी/१०५, हे त्यांना कसे उमजणार/१०६, भविष्याची शपथ/१०७, हत्ती आणि मुंगीची गोष्ट/१०८, रस्ते/११२, वारकरी/११५, झाड नि माणूस/११८, एका नामवंत मृत्युच्या निमित्ताने/१२२, अधिष्ठान/१२४, एफ. आय. आर./१२६, रस्ते होणाऽऽर/१२८, तत्त्व आणि तिलांजली/१३२, मी अनाथ, तू सनाथ/१३४, पुस्तकांच्या कविता/१३७, न उजेडणारा अंधार/१४३, मी कर्फ्यू पुकारलाय माझ्याभोवती/१४५, गोची/१४८, वात्सल्य वृक्षाखाली/१४९

## माझी तक्रार

माझी तक्रार
त्या दहशतवाद्यांविरुद्ध नाही
ज्यांनी नसलेला
इतिहास उकरून काढला

माझी तक्रार
त्या गारद्यांविरुद्ध नक्की आहे
ज्यांनी दहशतवाद्यांशी हात मिळवणी केली
अन् उत्खननाचं उदात्तीकरणही।

माझी तक्रार
त्या मूक निरीक्षकांविरुद्ध आहे
जे निमूट वाचत बसले आहेत.
नसलेला इतिहास



माझी तक्रार
मध्यमवर्गीय बघ्यांविरुद्ध नाही
असेलच तर त्या बुद्धिवाद्यांविरुद्ध
जे नेहमी सत्याचा आग्रह धरतात.
जळी स्थळी, काष्टी, पाषाणी

माझी तक्रार
त्या जातीय शक्तीविरुद्ध नाही
ज्यांचा खुला अजेंडाच 'जात' असते.
माझी तक्रार झूल पांघरून
गर्दीत घुसलेल्या कोकराविरुद्ध आहे
ज्यांनी चौकटी, फ्लेक्स, प्रतिक्रिया रंगवल्या

माझी तक्रार त्यांच्या विरुद्ध आहे
जे निष्पापांचा बळी घेतात
आपली पोळी भाजावी म्हणून
बिनपावत्यांची दुकानं चालवणारे
भर दिवसा दरोडे घालतात
राजरोस धुळफेक करून

माझी तक्रार त्या सर्व असामाजिक तत्त्वांविरुद्ध आहे
जे आपट्यांची पानं विकून
सोन्याचा धंदा करतात.

■

## नवे जागतिकीकरण

घेऊन काही नव्हतो आलो
ठेवूनही काही जात नाही
देऊन मात्र ठेवले आहे

जगणे माझे होते
संघर्ष ठायी-ठायी
संघर्ष माझा माझ्याशीच होता
मीच निर्मिलेल्या विवेकाशी

माझा संघर्ष
आत्मसंवादच
मनाने अंतर्मनाशी साधलेला

कळतेपणी कळाले एकच
इथे आपले कोणी नाही

जात, धर्म, कुळ, गोत्र
नव्हते मजपाशी
लागायला पदर लागतो म्हणे
तोही नव्हता खरा

सायासाने शिकलो-माकलो
आहेत चार भले भेटले
चार असे तसेही

साथ-संगत निभावत गेलो
प्रत्येक पाऊल उचलत राहिलो
जो देगा उसका भला
न देगा उसका भी
'त्या' ऊंचच ऊंच भिंतीवरून
'डोकावताना अन् 'त्या' ओलांडतानाही
यातना काही कमी नव्हत्या
साहिल्या सर्व आत्मबळावरच.

संधी नव्हती
नव्हते आरक्षण
संरक्षण मीच माझ्या
तटबंदीने उभारलेले

शहाणपणावर अनुभवाच्या
मीच माझा बाप बनलो
नाही म्हणायला सांभाळणारी आई होती
दाई असलेली

पोटची पोलिओग्रस्त पोर अव्हेरून
माऊलीनं पान्हा माझ्यात रुजवला
रिचवत मीच माझं रक्त तयार केलं
त्या परित्यक्त दुधातून
त्या दिवशी एक करुणाष्टक जन्मलं

भोगलेले भोग सरावे म्हणून
वीट वीट रचित गेलो
गनिमी हितचिंतकांनी

चिरे ढासळतील
याचीच मतलबी खबरदारी घेतली

मी रचलेले
माणुसकीचे लक्ष इमले
रातांधळ्या मतलबींना दिसले नाही
किती बरे?

त्यांच्या हाती न लागलेलं जग
देवकी-वसुधेचा कान्हा
यशोनंदन बनून
विधायक जगाचा स्वामी
विघातक पाताळात गाढण्यास
सज्ज आहे

माथेखोरांना मती वश नसते
हे त्रिकालाबाधित सत्य आहे
म्हणून त्रिखंडात
'सत्यमेव जयते'ची
गूज आहे, गाज आहे

उद्याच्या जगात
माणुसपणाचा धर्म जागेल तेव्हा
जात, धर्म, वंश, कुल, गोत्र नसेल

फक्त माणूस आणि माणूस
तेच नव्या काळाचं
नवं जागतिकीकरण असेल
अन् नवं उदारीकरणही
स्वार्थी खासगीकरणाला बगल देणारं!

■

## आधार


रवींद्रनाथांची एक कविता आहे...
'एकट्यानेच चालायचे...
अस्वस्थतेत तीच माझा आधार होते

आधारच असतो जगण्याचं साधन
नि कधी-कधी साध्यही!

आपली नाती अनेक
पाया मात्र एकच
आधार!

वेलीला वृक्षाचा
बाळाला आईचा
माणसाला निसर्गाचा
हा क्रम अनंत, अखंड
अगणित नि अपारंपारही

आपण किती चाळण्यातून
एकमेकास निवडतो
संशय, संदेह, संभावनेचे
किती ट्रेसिंग पेपर्स ना?



बोलतो, भांडतो
रुसतो, हसतो
पण त्या पलीकडे
शोध, सोस
आधारच

जीवन
व्यक्तिगत असो
की सामाजिक,
प्रतिष्ठित असो
की अनुल्लेखित
सामान्य
किस झाड की पत्ती
नो वन
पण असतो आधार
अस्तित्वाचा

संबधांचे किती खेळ
खेळले मी जीवनाच्या कॅलिडिओस्कोपमधून.
रंग, रूप, नाद, ताल,
आकार, निराकार
उकार, रुकार नि रफारही

नाकारूनही पाहिलं
स्वतःला
समाजाला
संबंधांना
विचारांना
तत्त्वज्ञानाला
साऱ्यांना टाटा करत
मी शोधतो नना किनार
नवा आधार

महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू
एम्. एफ. हुसेन, स्टीव जॉब्ज
सर्वपल्ली सर्ववल्ली
आधार पालवीच्या शोधात
रोज नवे फकीर

मीरा, पद्मजा, एडविना, अमृता
नावं नाहीत
अस्तित्व खुणा
आधाराच्या
रेडरोज, इमरोज
रोज रोज
नवा लपंडाव
नवा खोखो
आधारार्थ नवं मृगजळ
आकांतानं गाठलेलं

हो, नाही
बघते, पहाते
मी मित्र
मी मार्गदर्शक

सारा आधार-खेळ

आधार झोल
आधार मोल
आधार होल
सारे मनीचे बोल

जिंदगी क्या चीज है?
एक अवकाश
पोकळी
मीच माझ्या कर्माने निर्मिलेली
तेच माझे मर्म
वर्मही तेच
तोच माझा धर्म
कर्मही तेच
सारा पोरखेळ
आधारचळ
आधार चाळा
आधार वड

आधार
अंधार शोध
चाचपडत केलेला प्रवास
एकट्याकडून एकाकडे
समष्टीकडून व्यष्टीकडे
जन्मापासून मृत्युपर्यंत
एकच खेळ एकच शोध
आधार!

सत्य एकच
आधार मी तुझा
तू माझा...

■

## मौन

‘मौन सर्वार्थ साधनम्’
खरं नाही
अर्धसत्यच ते!

होकारा नकारा पलिकडचं मौन
द्वंद्वात्मक स्थितप्रज्ञता
स्वीकृतीपूर्व शांतता!

देवघरातला नंदादीप
नि तुळशी वृंदावनाची
सांजवात
अंधार-प्रकाशाची कातरवेळ
अर्धवेळाच असते
अर्धसत्याची सखी-सोबती
सख्खी बहीण

स्पष्ट होकारापेक्षा वेगळे काही
मौन स्वीकृतीच
नैतिक भयगंडातली
झुंजूमुंजू!

विचार व्यवहार
झटापटच

किंकर्तव्यविमूढता
अर्ध होकारच!

त्याला एकतर्फी ठरवणं
कधी-कधी
सत्याचा अपलाप असतो
सुप्त होकार

अग्रभागी स्त्री अहंमन्यता
पार्श्व पुरुषी अनुनय
या पलीकडचा एकांत संवाद
पूर्णसत्य प्रेम!
समाज बंधनात अडकलेलं
पारंपरिक मन
शीव-शिवार नवं ओलांडताना
जखमी होणं अटळ

तारेत अडकलेलं कोकरू
बिथरलेलं, गांगरलेलं
रक्तबंबाळ
तरी सुटकेची जीवतोड...

■

## समपर्णाचं आसुसलेपण


स्वर्ग माझा सखा
आकाश ठेंगणे
माझे जीवन गाणे
सोन्याचे नाणे

होकाराचा परिसस्पर्श
निष्पर्ण वृक्षावर वसंत
मनी अंगणी
कोकीळ गाणे

याचसाठी होता अट्टाहास
आग्रही तपश्चर्याही
तू नाकारलं नव्हतं
होता होकार हाच

तुझी मौन संगत
सोबतीला बोलके डोळे
उर्मीच्या अनंत खुणा
समर्पणाच्या पूर्व खुणाच होत्या

हमरी-तुमरीवर आल्यावर
बहाण्यांनी टाळणं



चातुर्य तुझं
चाणक्यी होतं खास

किती किती छळत राहिलीस
त्यानंच बळ दिलं पाठलागाचं
निष्ठा, व्रत
वरदान त्याचंच

अंतरात्मा बजावत होता
तो दिवस उगवणार आहे
अस्ताचल सूर्यास्तात
सूर्योदय आपसूक आहे

मौन दुरावा पाळला तेव्हा
ऐकू येत होते घंटानाद
अनहलनाद अंतरीचे
दूरच्या चर्चबेलचे

आज आश्वस्त मी
पंख मला नवे
कस्तुरीगंध खुणावतोय
उद्याचे मंगल मीलन

सरत्या सरी
कोसळणार आहेत
ढळणार एक दिवस
थोपवून धरलेले बांध

कृत्रिम नकार
मुळातच तकलादू
टिकणार किती काळ
अंतरऊर्मीपुढे

वीज कडाडेल तेव्हा
जुन अंडरस्टैंडिंग संपलेलं असेल
महापूर येईल तेव्हा
ग्रहण सुटलेलं.

आता भेटीचे बहाणे
फोनची निमित्तं
नित्य नूतन
समर्पणाचं आसुसलेपण.

■

## स्थितप्रज्ञ!

मी असा बेटावर
एकटाच उभा

किनाऱ्यावरील पक्ष्यांचे थवे
सख्खे सोबती माझे
गिधाडांनी झडप घातली मजवर जेव्हा
मौन, निष्क्रिय कसे ते?

मला आठवतं
गेल्या ऋतूत
अशीच गिधाडं आली होती
हुसकावून त्यांना
मी किनारपक्षी वाचवले होते

मी त्यांच्या प्रत्येक प्रसंगी उभा
छातीचा कोट करून
अन् ते माझ्यावर घाला आला तेव्हा
काखा वर करून सरळसोट उभे?

राजकारणी, समाजकारणी
येथून तेथून सारे एक
तत्त्वज्ञानाची शेखी मिरवत
झुलतात कसे आत्ममग्न?

ती त्यांची मजबूरी असते
त्यांना त्यांच्या भात्यात
नित्य हवे असतात बाण निरनिराळे आणि नवे नेते,
कार्यकर्ते, बुद्धिवंत आणि सोमेगोमे, अलाणे-फलाणे...

त्यांना वेगवेगळे बाण हवे असतात
वेगवेगळ्या वेळी
वेगवेगळ्या कामासाठी
मात्र सगळ्यांना ठेवतात ते वेगवेगळे
धूर्तपणे!

आजकाल त्यांनी
कुल्हडमधून चहा प्यायचा सोडलाय
'यूज अँड थ्रो' ग्लास ते वापरतात आताशा
आपल्या नव्या संस्कृतीचा पुरावा म्हणून

खासगीत ते तुमचेच असतात
तुमचेच असल्याचे लुटूपुटू प्रत्यय देतात रोज
पुरावे ठेवत राहतात छुटपुट खटपटीचे
अन् ठेवतात कनवटीला बांधून
ऐनप्रसंगी उपयोग व्हावा म्हणून

त्यांना सतत भय, भीती
पद, प्रतिष्ठा, जनमत
अन् सार्वजनिक प्रतिमेची
स्वतःच हस्ते परहस्ते निर्मिलेल्या

ती त्यांची गरज असते
कंपल्शन असतं परिस्थितीचं
कंपल्सरी इमेज जपावीच लागते
रोज वर्तमानात उजळण्यासाठी कडक लिनन
भडक लाइम लाइट
तडक कोंडिबा टाईट!

त्यांना माझ्यासारखे
बळी घ्यावेच लागतात
नाका तोंडात पाणी जाऊ नये म्हणून
माकडाच्या आईला
बाळाच्या डोक्यावर
पाय ठेवावाच लागतो
प्राण, प्रतिष्ठा, प्रतिमा
सारं जपण्यासाठी
कोकरं बळी द्यावेच लागतात
गिधाडं पक्ष्यांची पिले खात राहातात
प्रत्येक ऋतूत

मी बेटावर एकटाच उभा
स्थितप्रज्ञ झाल्यापासून.
पूर्वी बेटावर
एकटाच होतो
आता भर समुद्रातही एकटाच आहे.
लाटा येऊन जातात तेव्हा
पायाखालची वाळू सरकते
तरी मी पाय रोवून घट्ट उभा
एकटा समुद्राच्या भरती-ओहोटी विरुद्ध!


किनाऱ्यावर दगड गोटे
बगळे, डोमकावळे
नित्य उभे
'काक चेष्टा बको ध्यानम्'
मी मात्र अर्जून होऊन आता
मत्स्यभेदास कटिबद्ध!

सागराची गरज
माझी सोबत
काळ भौरे (भैरव नव्हे!)
माझे सगे-सोयरे

दिन रात
उसळत्या लाटा
माझ्या मनी
नव्या वाटा

मी माझा वंशवृक्ष
मी माझा काळपुरुष
मी एकटा
समुद्रकिनारी, भर समुद्री
स्थितप्रज्ञ!

■



## माणसं

माणसं
मनस्वी, तपस्वी, तपस्वी, ऋषी, संत!

माणसं
तऱ्हेवाईक, तापट, तिरसट, तिऱ्हाईल!

माणसं
व्यवहारी, कंजुष, कजाक, कफल्लक!

माणसं
साहित्यकार, चित्रकार, शिल्पकार, भाष्यकार!

माणसं
गायक, वादक, नर्तक, सार्थक!

माणसं
प्रेक्षक, श्रोते, तमाशबीन, तटस्थ!

माणसं
काही देना बँक, तर काही लेना बँक
काही कद्रदान, तर काही कर्जबाजारी, कर्जबुडवे!

माणसं
फिक्स डिपॉझिट अन् फिक्स बुडवणारेपण
फिक्स मत देणारे, पैसे घेऊनही न देणारे, कृतघ्न!

माणसं
जीवाला जीव देणारी, जीव घेणारी
जीव लावणारी अन् काही जिव्हारी!

माणसं
षड्यंत्री, पाताळयंत्री, कारस्थानी, दगाबाज!

माणसं
भरोश्याची, बेभरोश्याची, दगा फटका करणारी, अवसानघातकी!

माणसं
वापरणारी
सोडणारी
नादावणारी
टाकाऊ!

माणसं
फोटोतली
स्माइल प्लीज म्हटलं की
हसणारी.

■

## शहाणं जगणं

मला जात, धर्म, वंश, कुल, गोत्र
काही नाही.
हे चांगलं की वाईट
ते काळ ठरवेल
नाहीपेक्षा त्याला ते केव्हातरी
ठरवावेच लागेल

मी औरस की अनौरस
स्पृश्य की अस्पृश्य
कालसंगत की कालबाह्य
मला ठावूक नाही
पण तेही एकदा
ठरेलच
कारण
काळ निर्णायक असतो म्हणे
विशेषतः समाज जेव्हा
निर्णायकी होतो तेव्हा

मला माझे आई वडील
ज्ञात नाहीत हे खरे
पण ते नव्हतेच असे मात्र नाही.
त्यांना तुम्हीच भूमीगत केले

खरे तर भूमीगत व्हायला भाग पाडले
तुमच्या त्या तथाकथित
नैतिक-अनैतिक
भ्रामक थर्मामिटरवर
माझ्यावर आई वडील
लादले गेले नाही
हे किती बरे!
एकट्या विश्वामित्राचा
डी. एन. ए. तपासून काय उपयोग?
टेस्ट घ्यायचीच तर प्रत्येक बाळाबापाची घ्यायला हवी
निरक्षीर न्याय
तोच असेल ना?
उडदामाजी काळे-गोरे
धुतल्या तांदळासारखे किती बरे?
तेरी भी चूप मेरी भी चूप
मी खीर खाल्ली तर बूड बूड घागरी

जन्मोजन्मीच्या
जात, धर्म, वंश, कुल, गोत्र
यांना शोधणे
म्हणजे आपली कबर खोदणे.
त्यापेक्षा
माणसाला 'माणूस' म्हणून स्वीकारणे
किती बरे?

■


## जनगणना - १

सांगा, सांगा, सांगा
तुमची खरी गरिबी श्रीमंती
शपथपूर्वक सांगा...

घरी किती गाड्या, स्कुटर्स
मोबाईल्स, टी. व्ही, संगणक
की वडापनं जाता,
लालडब्यातून फिरता
की करता पायपीट
स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवानंतरही?

हेही सांगा
खातं कुठंय?
स्वीस बँकेत की
पतसंस्थेत (बुडणाऱ्या!)

वाइच हे बी कळू द्या
जगताय कशावर?
रोजावर की एफडीवर?
की फंडावर पदरच्याच?
की आहात टॅक्स फ्री एन. आर. आय.?
तिथं टिकोजीराव, इथं मात्र बाजीराव?



मस्तानी तिथं बी मी हितं बी!!
असं तर नाय?

घर स्वतःचं की
इंदिराचं रो की स्वतंत्र? की कुडाचं?
वीज, नळ, गटर हाय?
की ओढ्यावरच सर्व?
त्या निर्मलग्राम नि जलस्वराज्यचं
काय झालं? तेबी सांगा.

पोर साळंत जातायत
की कामावर?
खाता, पिता काय?
पिझ्झा की पिठलं?
काढा की कोकाकोला?
ब्रेड की भाकरी?
की उपाशी, भूकबळी?

हेही कळू द्या...
पूर दुष्काळ निधीस पैसे देता?
की गणपतीची वर्गणी भरता?
पदरचा चहा देता कुणास कधी?

अनाथ, निराधार, अनौरस, बी.पी.एल
वेश्या, कुष्ठरोगी, देवदासी,
शेतमजूर, भूमीहीन, धरणग्रस्त
मोलकरीण, बिगारी
यांना का नाही आरक्षण?
कुणी कधी विचार केलाय?
केलाय कधी कुणी त्यांच्यासाठी संप?
काढलाय मोर्चा यांना पाचवा दर्जा नको म्हणून?
का रोज उठून नवा वेतन आयोग?
आता हे संपलंच पाहिजे...
कायम स्वतःच्या पोळीवर तूप ओढणं
नि रोज पिझ्झा, पुरणपोळीची मनोरथं रचणं.
हवय नं माणुसकीचं जग,
जात, धर्म, पंथ, स्त्री-पुरुष आरक्षण मुक्त!
हवंय खरं मानवधिकाराचं राज्य,
विकासाची सावली खऱ्या गरजवंतावर धरणारं!

माहितीच्या अधिकाराखाली
कुणीतरी खरी माहिती देईल का?
भारतातले खरे दलित, वंचित, उपेक्षित कोण?

नवी जनगणना आजच सुरू झालीय...
भारताच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती
त्यांनी भरलेली माहिती
नि एका बीपीएलची पण...
मला हवी आहे...
'खरा माणूस कसा असतो' ते पहाण्यासाठी.

■

## जनगणना - २

जन्मतारीख : एक्स-रे मशिनननी ठरवलेली
नाव : ४४
आँ ?
अहो मी अनाथाश्रम, रिमांड होमवाला नां ?
तिथं माणूस नसतो
एक नंबर असतो पूरा नंबर
मैलाचा असतो तसा
नि कैद्याचाही.

वडील : विश्वामित्र होते
तेही जन्मापूर्वी भूमिगत झालेले

आई : कुंती होती...
तिनं मला नदी आटली म्हणून की काय
वाळवंटात टाकलं होतं
वाळत, सडत, कुजत
स्वतः मात्र झाली संभावित
कदाचित सौभाग्य सावित्रीही!

जात : मनुष्य.
तीच बरी नि खरीही!
कशाला हवीत लेबलं ?

उच्चनीचतेची,
अन् आप-पर भेद रुजवणारी.
जातीचे गंड नि अहंकार घेऊन
रांगणारे
बरेच मी पाहिले, साहिले
त्यापरास पक्षी बरे
रंग मिळून राहणारे

धर्म : माणूसकी.
हिंदू नको...
मनुचा विटाळ उगी.
मुसलमान नको...
शिया-सुन्नी वाद-विकोप.
ख्रिश्चनही नको...
कशाला हवेत कॅथॉलिक, प्रोटेस्टंट
रोज नव-नवे उगी स्टंट!
नको जैन, बौद्ध नि पारशी
सारे बिचारे माझ्याचसारखे बेवारशी
कधी सरशी, कधी तोंडघशी

जन्मतारीख : एक्स-रे मशिनने ठरवलेली
तीही दहाव्या वर्षी
ॲफिडेव्हिट झिंदाबाद!
मॅटर्निटी होम मुर्दाबाद!!

जीवन : उत्तम निवृत्त
तरी निरंतर प्रवृत्त!
नाकावर टिच्चून आहे.
प्रतिष्ठित नि थोडा सन्मानितही!
आताशा 'त्या' साऱ्यांना सर्टिफाय करतोय...
हे तेच ते
मला अनाथ, अनौरस करणारे नि ठरवणारेही तेच

एक नंबरचे बेभरोसे
उच्चकुलोत्पन्न
सुसंस्कृत
सभ्य म्हणे
माणुसकी शून्य

■

## **माणसं बदलतात...**

माणसं
इथून तिथं गेली की
बदलतात
सरड्याच्या रंगासारखी

इथं ते समाजशील
सर्वग्राही होते खरे
वागत, बोलत, लिहीतही होते बरे

तिथे गेले ते
अंमळ वरच्याच खुर्चीवर
त्यांना स्पप्नातही कधी वाटलं नव्हतं
आपण असे एकदम 'महा' होऊ म्हणून

मग त्यांना सारं जग
वाटू लागलं थिटं
अलाणे-फलाणे
खुर्द-बुद्रुक
चिल्लर-विल्लरही
आकांक्षांपुरती तिथे गगन ठेंगणे!

मग त्यांनी आपल्या गुरुजींनाही
वेटिंगमध्ये बसवलं

अन् महापौरांनाही.
तेव्हा ते संदर्भ शोधत होते म्हणे
'जग बदल घालुनि घाव
मला सांगुनि गेले भीमराव'
ही ओळ कुणाची म्हणून.
इथं होते तेव्हा
काय भाषण अन्
काय भाषा, तोरा राव
अन् तिथे
मिया मिठ्ठू पोपटराव!

इथं होते तेव्हा
मूल्य, संस्कार, संस्कृती, सभ्यता
साऱ्यांचा होलसेल, एकरकमी ठेका
ह्यांचाच नि ह्यांचाच

तिथं गेलेन काय
कायाकल्प झाला
साक्षात्कार होतो तसा.
'काही नसतं हो तत्वबित्व,
'स्व' असतो मिलियनर
(नि 'स्वामीभक्ती एकमेव ज्वर!)

तेलही गेलं
नि तूपही तेव्हा
त्यांना चार सिगारेटी
एकदम पिताना पाहिलं होतं
नि पाहिलं होतं
बियरचे ग्लासवर ग्लास
एकदम रिचवतानाही!

आताशा ते अंमळ नेमस्तच...
बिन आयाळाचे सिंह
त्याचं नेतृत्व, कर्तृत्व

एकदम गायब
कापराप्रमाणे

त्यांचं ते माणुसपण
कधी, कुणी, कसं
हिरावलं कोण जाणे
पोपटात असलेल्या राक्षसाच्या प्राणाप्रमाणे

नाही म्हणायला एकदा
त्यांची डायरीच लागली हाती
त्यांच्याच टेबलवर बेफिकीर पडलेली
त्यांनीच लादलेलं वेटिंग कंठताना...
गुरूजी, महापौरांप्रमाणे

ते होते व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये
चक्रव्युहात एकलव्यागत.
इकडे मी अँटी चेंबरमध्ये बंदिस्त
शिपाई चहा, बिसलरी देत
न सांगताही टेप सोडायचा
यू आर इन क्यू...


त्या डायरीच्या शेवटच्या
कव्हरमध्ये खुपसलेल्या पानावर
लिहिलेलं मी वाचलं
'इथं आलो मूर्खपणा केला
तिथंच बरं होतं नि बराही
जागतिकीकरणाचं स्वागत करत
उदारीकरणाचं तोरण बांधायला आसुसलेला मी
माझं मात्र खासगीकरण झालं होतं
'स्व'ला गहाण ठेवून
इथं माझा कांचनमृग झाला,
सोन्याचा मुंगूस व्हायला आलेला मी
मजला माणसांचा मुडदूस झालाच कसा?

आता राहणं अवघड
परतणं तर त्याहूनही.
चक्रव्युहात अडकता येतं
सुटका नसते
हाकलेपर्यंत

माणसानं राहावं
जसे आपण असतो तसे.
उंटाचा मुका घ्यायला जायचं
अन् सायबाचा मुकादम व्हायचं?

आपलं ते रो हाऊसिंगच बरं
वन बीएचकेसारखं सुख नाही
पायापेक्षा मोठं पांघरुण नको
मिडास महाल नकोच नको.
अपना हाथ जगन्नाथ
माणूस फक्त एकनाथ!

■



## मी या काळात नाही...

मला नाही कळत
मी जगतो
की रोज मरतो थोडा थोडा
मी या काळात नाही

माझ्याच घरात उपरा
समाजात कसा मध्य मी?
आत, पात, धर्म, पंथ, पक्ष
स्वतंत्र भी स्वयंभू
मी या काळत नाही.

टिव्ही नाही पहात
की वाचत वर्तमानपत्रेही
नाही म्हणायला ऐकतो बातम्या
रेडिओवर नि वाचतो काही-बाही
मोबाइल, फेसबुक व्हॉट्सॲपवर
असून त्यात नसतो मी
की माझे काही नसते तिथे
मी या काळत नाही

राहत्या घरी नसतो जसा
तसा राहत्या गावीही

गाव गोसावी मी
असतो तिथे नसतो
मी या काळात नाही

तरी माझे जगणे जारी
इथे नसे त्या दारी
गावोगावी माझी वारी
तऱ्हा या फिरस्त्याची न्यारी
मी या काळात नाही

मी माझ्यात नाही
उसवलेले धागे
इतरत्र, सर्वत्र
स्वकीय, संवेदी जिथे तिथे
मी या काळात नाही

मी माझ्यात नाही

■

## मलाच न कळे

शब्द माझे बापुडे
त्यांचा भावस्पर्श कुणा
कळावा कसा
तेच ना कळे

ओढ माझी अनिवार
तिलाच ओढ लागे
तर प्रवाह कसा
वाहे ना कळे

मी आवडता
की नावडता
की तात्पुरता
मलाच न कळे

माझी धाव
मृगजळाची
की गंगाजळाची
तिलाच न कळे

मी मीठ
की साखर
की नवसागर
उडून गेल्यावरच कळेल

■

## मस्त अलम

हे कोकीळ कुजन
सकाळचं
पूर्वसूचना
निशंका
बहुधा
डोक्यावर सूर्य आल्यावर
फुरणाऱ्या लाही-लाहीची

सायंकाळचं
कोकीळ कूजन
पहाट वाऱ्याच्या
थंडाव्याचं
आश्वासन
आणि विश्वासही!

कावळेही ओरडत असतात
त्यांना साथ देत
सकाळी, सायंकाळीही
पण त्यांच्या आवाजात नसते
ना शंका, ना आश्वासन
असेलच तर
चाहूल पाहुण्यांची

पत्राची, निरोपाची
अन् काहीच नसेल
तर तो आरव
पूर्वजांच्या पूर्वभोगांचा
जो माझ्या पिढीच्या
न गावी, न मनी

कोंबडे ही आरवतात
कोकिळा, कावळे, चिमण्यांसोबत
पण त्यांची बांग
सूर्योदयाची आरोळी खरी
सूर्यास्ती मात्र
तो मौन कसा?

चिमण्याची चिवचिव
सकाळी, दुपारी, सायंकाळी केव्हाही
ग्रीष्म ते वसंत सदाकाळ
ना संकेत, ना सूचना
सदासर्वकाळ आकांत
म्हणून दुर्लक्षित!

आताशा येताहेत
छोट्या चिटुकल्या चिमण्या
चिमणी नसलेल्या
पण चिवचिव व चंचलता तीच ती
त्या आल्या की लक्षात येतं
खळ्यात सुगी सुरू झाली असावी

कडीलिंबाच्या झुडपावर
बिया लगडताच
बुलबुल जोडी कशी
घिरट्या घालत
चिक्‌चिक् करत



साताजन्माची सप्तपदी
आपल्याच दाल्ल्यासोबत

भारद्वाज मात्र भारदस्त
ऐन गुढीपाडव्यात गायब
त्याचंही गुटर्र गुऽऽ
कबुतराशी ईर्ष्या करणारं!
रंग, ढंग, तकाळी, तलम
सारं कसं मस्त अलम!

■

## भान

पूर्वी मी
झुरळ, ढेकूण, विंचू,
साप, गोम, उंदीर,
पाल नि त्यांची पिलंही
वेचून, ठेचून मारायचो,
आताशा धीर होत नाही,
हे पर्यावरण भान की
मरण यान दिसण्याच्या खुणा
माहीत नाही

पासष्टाव्या वर्षी
चहाच्या कपात
साखरेतून चुकून पडलेल्या
मुंगीलापण मी
उचलत असतो अलगद चमच्याने
मलाही असंच अभय द्यावं कुणीतरी
या स्वार्थाने.

सावल्या लांब होत आहेत
नि आयुष्य आखुड
एकटेपण दाटत आहे

मीच माझ्याभोवती उभारलेल्या
तटबंदी, चिरेबंदीमुळे

एकान्त शान्त साधना खरी
नवा छंद जगण्याचा
कोलाहलात आताशा
जीव गुदमरतो सामाजिक,

ही नवी कला जगण्याची
नि जीवनशैली ही
'नॉट एंटीटी लाइफ'
अलक्षित मरणाची हमी.

हे माझं अधःपतन की
ऊर्ध्वपातन माझ्या पूर्व जीवनाचं
कळेना कसे ते
वर्तमानाचे संकीर्ण वळण
मला घेता येत नाही.

हा पूर सूज आलेला
ओसरेल तेव्हा
काठावर बसलेला मी एकटा
प्रतिबिंबाशिवाय
वस्तुनिष्ठ, आत्मनिष्ठ
स्वमग्न!

■

## संकेत


या जगाचे काही संकेत आहेत,
ते जपायचे असतात.

संकेताचेच राज्य हे,
इथं गाढवं मरतात ओझ्यानं
नि शेंगरू येरझाऱ्यानं.
टिकोजीराव औट घटके
फोन कानाशी लावून
धन्याची लाळ चाटत असतात
संकेत पाळण्यासाठी.

इथे येतो तो जातो,
निसर्ग नियम म्हणून
तरी पर्मनंट असल्याच्या भ्रमात
तंबीचे गुद्दे नि मेमोचे फटकारे
तो देत असतो केवळ संकेत म्हणून.

प्रसिद्धीला हपापलेले
काही न करता माशा मारत
नाव यावं नि व्हावं म्हणून,
जीवाची धडपड करत असतात
बूड स्थिर रहावं म्हणून.

■



## तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस...

आता चर्चा ही नको त्या काळ्याकभिन्न रात्रीची.

तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस
म्हणून दिवे मी केव्हाच मालवले होते
डोळ्या-डोक्याची जळजळ थांबावी म्हणून,
लख्ख प्रकाशाची प्रतीक्षा होती.

ते सर्व नीतीवाले भोंगळ ठरले तेव्हा
वाटले होते तू तरी सूर्य आणशील
हो! पसापसाभर एकटाकी मतं म्हणून तरी दिली होती
आता तरी टाकीचे घाव नको म्हणून
देवपणाची अपेक्षा होती.

फक्त वाटत होतं
विधवेच्या विटाळानी शंकराचार्याला
तीन-तीन वेळा न्हावं लागलं नसतं.
नि भरधाव लोकलमध्ये
वस्त्रहरणाचे खुले नि मोफत प्रयोग झाले नसते.
वाटलं होतं,
अंमलदाराच्या चावडीत अंधत्व येणार नाही

जामदारखान्याच्या किल्ल्या चोरांच्या कनवटी लटकणार नाहीत.
कमीत कमी अपंग वर्षात तरी

अधुत्व येईल अस वाटलं नव्हतं
फुलनदेवीच्या मस्तकाचा लिलाव
महामस्तकाभिषेकाच्या सुमुहूर्तावर
होईल असं वाटलं नव्हतं

म्हणून
तू आणणाऱ्या सूर्यासाठी
मी उष:कालालाही अव्हेरलं होतं
केवळ तू सूर्य आणून देते म्हणाली होतीस म्हणून...

■

## सरल्या ऋतुचं वास्तव


जेव्हा ऋतू हिरवा बरवा होता
वहातही होता वाह्यात
तेव्हा तुझं रुसणं, फुगणं
होतं लटकं

आता ऋतू सरल्यावर
तुझं असं मागं लागणं
वरातीमागून घोडं नाही का?

प्रत्येक गोष्टीचा आपापला ऋतू असतो खरा
गोष्टी ज्या त्या वेळीच घडलेल्या बऱ्या
नि शोभतातही! असतातही बऱ्यापैकी खऱ्या
आता असा लाडिकचाळा
फोनवर फुका गळा
हा लटका फार्स नव्हे का?

झालं गेलं पुर झालं
तुझं पावित्र्य नि पातिव्रत्य
तुला लखलाभ!
अन् माझं सत्यवानपण मला

प्रेम काही शिळोप्याचा नाही खेळ
तो असतो हृदयाचा मेळ.



ते असतं समर्पण,
सरपण पुढं गेलं तरी
सरता नाही सरत,
ते असतं उत्सर्जन नि विसर्जन!
'स्व' नि 'स्वत्वा'चं
अर्जन परिमार्जन ते नसतंच मुळी.

■

## सेल्फी

पिंजल्या केसात तुझ्या
जीव का गुंततो वेडा
उष्म श्वासात तुझ्या
हा मनाचा का वेढा?

त्या पहिल्या दिवसापासुनि
मन कसे वेडे पिसे
जवळ अधिक येता कसे
अधिकचि अस्वस्थ असे?

कां हा फास
तुझ्या मधुर मिठीचा
सोडतो सोडेना गुंता
असेच समाधीस्त रहावे कसे?

असे बावनखणी सौंदर्य
नि मखमल, लखलख रोमरोमी
हृदय कसे लकलक, धकधक
ही निशीदिनी बेचैनी का कसे?

तुझं सारं कसं न्यारं
न पिता येणारं वारं
मन असे वेडे पिसे
कां गं नित्य उसासे?

वय नसतं शरीरी
मनी उरी सळसळीत असे
कां की सुरसुरी न संपणारी
सरल्या सुगी नंतरही?

तुझे उपकार अपार-अपरंपार
शब्द माझे तोकडे असे किडमिडे
फुलांच्या तुझ्या पूजेपुढे
जी नित्य नम्र कसा आज्ञाकारी?

राहू दे प्रीत अशी वेडी
असली जगावेगळी रीत ही
जळो जग जीवघेणे
आपण का भित्रे थोडे?

होकार नकारा पलीकडे
नाव कशी ती जावी दूर
बेबंध सागरी ती हुरहूर
किनारा मुक्त प्रवाही का नाही?

हे सर्व तुझ्या हाती
मी असा एका पायी
निर्णय तुझा सर्वस्व
केव्हा कळे मनी कानी?

'तुझी समझदारी खास हुशारी
प्रेमासाठी तुझ्या कोलांट्या
खास गुंतविणाऱ्या खऱ्या
तरी दुरावा कळेना कसा?

सोड हट्ट, मन घट्ट
धरण रोज नसतं रोज फुटत
सजणी नको हा रुसवा
जीव असा अडकून कसा?

■

## ग्रहण

उदास निराशेचे ग्रहण कशाला?
ऊर्जा, उर्मी मनी असू दे.
ढंग येतात, जातात,
मनी-मानसी स्वप्ने वसू दे.
प्रश्न, विचार राहणारच,
झगडण्याचे बळ बाळग
प्रश्नांना माझ्या हवाली कर,
आणि सुखनैव जग .

■

## अशी अचानक

अशी अचानक थबकलीस कां?
मला पाहुनि लाजलीस कां?
झाली दृष्टिभेट,
तुझ्या-माझ्या नेत्रांची
आतुरलेल्या कितीतरी अनामिक भावनांची

अर्थ तुला या क्षणिक भेटीचा
खरोखरीच उमगला नव्हता कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

तुझ्या खळीचे हास्य बरसते
मला पाहता विरत असे,
हास्य विलोपनाचे गुपित तुजला
खरोखरीच उमजले नव्हते कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

कां खेळ मांडिलास?
होकार-नकारांच्या पाठलागांचा,
मूल्य तुला दीर्घ मीलनाचे
खरोखरीच समजले नव्हते कां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

प्रिती मजवरी नसताना
कां वृथा देखावा मृगजळाचा?
औट घटकेचा प्रेमी मजला
खरोखरीच बनवायचा नव्हता नां?
मग मला पाहुनि थबकलीस कां?

■

## तुझ्या सहवासात...

तुझ्या सहवासात,
मृत्तिकेसही गंध फुलांचा येतो.

तुझ्या बोलण्याने
मोत्यांचे रूप शब्दा येते.

तुझ्या नेत्रकटाक्षानं गं,
उष्मा बर्फात येतो.

तुझ्या हसण्याने,
धुंदी मदिरेची येते.

तुझ्या स्पर्शाने गं,
जीव पाषाणातही येतो.

तुझ्या सहवासात,
माझे मीपण गळून जाते.

■



## खूणगाठ

तो बहर ओसरल्यावर
आज पुन्हा यावा-यावासा का वाटतो?
वाहून गेलेला नदीचा पूर
उरी पुनःपुन्हा दाटत रहातो

माझ्या अंगणात पडलाय आज
पानगळीचा पिवळा जर्द सडा
मनी मात्र सरलेल्या
आयुष्याचा तोच झिंग आणणारा पिंगा

याचं मोठं आश्चर्य वाटतं
वसंत सरण्यापूर्वी पुस्ता
हा हट्टी ग्रीष्म आलाच कसा?
अजून शरदाचा खरा रंग
उठलाय तरी कुठे?

सरीत चिंब भिजण्याआधीच
श्रावणसरी ग सरल्या कशा?
हिरव्या गालीच्याचा अजून नाही पत्ता
कारळ, मोहरीच्या फुलांना
असा लख्ख बहर का यावा?

हेमंती फला-फळांच्या बागा, ते ताटवे,
पायाखाली येण्यापूर्वी तुडवले कसे नि कोणी?
अजून घन-गर्भगंधी झुळूक ही नाही,
ताटवे तट-तट तुटले तरी कसे?

जाई, जुई, मोगरा, बकुल
व्याकूळ होण्यापूर्वी निर्गंध का व्हावेत?
खरंच होता कां गंध कधी
मग तो गेला तरी कुठे नि कसा?
आता ही तगमग केवळ असह्य!
एकदा त्यांना विचारायलाच हवं

न टाकलेल्या त्या प्रेमपत्रांनी
आज अचानक का फडफडावे?
कदाचित तिच्या आजी झाल्याची कुणकुण
त्यांना लागली असावी.
हा बहुधा तिच्या ऋतू सरण्याचा
पत्रांना झालेला साक्षात्कार असावा

आपण तसं कधी देवा-ब्राह्मणाच्या साक्षीने
सात फेरे काढले नव्हते,
मंगळसूत्र, कुंकू, चुड्याचा उपचार
आपणाला कधी अनिवार्य वाटला नव्हता नां?

आठवतं तुला?
एकदा हळूच आपण
साऱ्यांचे डोळे चुकवून
अंगठी कशी पातली होती ते.
अन् हो, चांगलं आठवतं मला...
तू हट्टाने माझ्याकडून घालून घेतली होतीस!
परवा नातवाच्या बारशात ती तू मोडली तेव्हा
काय कालवाकालव झाली होती तुझी म्हणून सांगू?

पूर्वी गवत, गोवऱ्या दिसल्या की
तुझ्या सहवासातील गुलाबी थंडी
कुडकुडायची.
आज सरण आठवतं नि स्मशान!
केसाचं रंगान्तर
माझं वेशांतर नि स्थित्यंतरही अनेक
हेच का ग असतं आयुष्याचं भाषांतर?

आठवतं? मी फोन करायचो पूर्वी तेव्हा
'हे' आहेत म्हणून तू अलगद कट करायची
नि आज पूर ओसरल्यावर
किती सफाईने मिस कॉल देतेस!

अन परवा मंडईत
तुझ्या कळल्या मुला-मुलींसह अचानक भेटलो
तू 'काका' म्हणून ओळख करून दिली
तीही किती सहज!
मुलांनी ताडलं तरी
तुझा तो बनाव खासच उजवा होता

आता कशाला हे सारे...
असं वाटलं तरी
ते मखमली झरे वाहतातच
तिकडे क्षितिजावर अजून
मिळून दूर-दूर उडण्याची हूरहूर
या एकसष्ठीतही
त्या सोळा वर्षांच्या दिवसांचीच
खूणगाठ असते.

■



## तू भेटणारच नसशील तर...

तू भेटणारच नसशील
तर बोलून काय उपयोग?

जग निघालं 'लिव्ह इन रिलेशनशिप' कडे
अन् आपण थांबायचं 'फोन इन रिलेशन' पर्यंत

आतल्या आवाजागत नैतिक नसतं दुसरं काही
संस्कार, परंपरा असतात धोंड धाडसी जगण्यातील

प्रेम नि आदराचं द्वंद्व
खरं तर भय नि धाडसाचं असतं भांडण

आत्मबलासारखं बळच
महाबळ असतं मुळी

माणसं सारे सारीपाट मांडतात
स्वार्थाचे पिंड रचून
तू तरी निरपेक्ष असशील असं वाटल होतं

आज मला खरं अंतर उमगलं
स्वप्न नि वास्तवातलं

गुड डे, स्वीट ड्रीम
सारे असतात शब्द फुगे,
आपणच आपली फसवणूक करण्यासाठी

सोडलेले कवेत न येणाऱ्या आकाशात
आपला अवकाश भरण्यासाठी
आपण दुसऱ्याचं आकाश
नाही ना आक्रमत?
एकदा कधी तरी हे ठरवायलाच हवं

वाहून गेलेली ओंजळ
भरत नसते कधी
वाया गेलेलं वय
पश्चात्तापानं नसतं भरत

आपले विचार, व्यवहारसापेक्ष किती
संदर्भ बदलले की ते बदलतात दिशा
आणि दशाही!

आपणाला खरं जगता येत नाही
म्हणून तर आपण कुबड्या वागवतो.
कधी पातिव्रत्याच्या, कधी प्रतारणेच्या
मनासारखं जगणं जगणं असतं

मारून मन जगणं म्हणजे
असतं मरणं!
आता पुरे हे द्वंद्व,
नाही बळ पेलायचं
मनाचं आकाश,
त्यांनी आत्महत्या करणं चांगलं.
अन् स्वतःस गाढून घेणं.
आत्मवंचनेसारखी फसवणूक नाही.
खोटं जगण्यासारखी नाही शिक्षा दुसरी.
कुस बदलत रात्र घालवण्यापेक्षा
मनाची मूस बदलणं सोपं.
पण त्यासाठी लागतं
विवेकावर जगण्याचं शिक्षण
अन् शहाणपणही!

■

## जीवनगाणं

प्रेम म्हणजे केवळ शरीर
हे अज्ञानच एकप्रकारचं.
प्रेम त्या पलीकडची,
एक मनस्वी अस्वस्थता असते खरी!

शरीरापलीकडलं मैत्र असू शकतं
नि तेही पातिव्रत्याइतकं
श्रेष्ठ असू शकतं

मैत्र असतं इंटलेक्च्युअल फ्रेंडशीप
नि सोशल कंपनियनशीपही!
संकुचित, एकारलेल्या
अन् वीट आलेल्या नात्याची
ती सहज प्रतिक्रिया,
नि सकारात्मक प्रतिसादही असतो तो!

पण त्यासाठी आवश्यक असतं
शहाणपण नि आत्मशोधाची अनिवार ओढही.
मांडलेला संसार न विसकटता,
नि क्षणा-कणाची प्रतारणा न करता,
मैत्र निभावता येतं,
त्यासाठी लागतो संयम नि समजही।

मैत्रीचं गारूड उमजायचं तर
यावं लागतं कवच फोडून बाहेर
नि कोशमुक्त व्हावं लागलं अंतःप्रेरणेने.
उभे आडवे, उलटे सुलटे,
सरळ-वाकडेही,
धागे सोडवावे लागतात अलगद
स्वहस्ते हस्तक्षेपाशिवाय.

ते सोपं नसतं गुणगुणण्याइतकं
गुंता असतो नात्यांचा
नि फेर असतो
स्वतःच दिलेल्या हातांचा
अन् हाती घेतलेल्या नव्या नात्यांचाही.

तो सुटू शकतो,
आलेल्या अनुभवांनीच
आणि ठेचा, खाचा, खोचांनीही!
त्यासाठी हवं असतं फक्त साहस
स्वप्रज्ञ निर्णयाचं
नि एक पाऊल पुढे टाकण्याचं!

अजाणते टाकलेल्या सप्तपदीपेक्षा
हे पाऊल असतं ठोस,
कारण ते अंतर्मनाचं
गीत, संगीत असतं,
नि नव्या वादळाचं भारूडही।

आपण शिकतो खरे
पण शिक्षित होतो की सुशिक्षित
ते काळच ठरवत असतो.
आलेल्या अपेक्षाभंगातून
नि वास्तवाच्या भानातूनही.

ते आपसूक उमगत राहते.
अंतर्मनाचा कौल
नैतिकता, पावित्र्य, पातिव्रत्य
एक नैसर्गिक न्याय!
मन नावाची गोष्ट
बाकी सारं असतं कुंभाड
मन- ब्रह्मच असतं अंतिम सत्य!

मन गहाण ठेऊन जगणं
लोडणं घेऊन फिरणं असतं,
राधा वाडा, उष्टी काढा
हेच असतं का जीवन?

सौंदर्य, समज, लाघव
सारं असून गुलामीत जगणं,
स्वविसर्जन असतं,
निग्रहानं केलेली हाराकिरीही!

स्टीव जॉब्जला गवसलेलं ॲपल
आत्मशोधातलं रत्न होतं.
ते न्यूटनचं सफरचंद
नि आइन्स्टाइनची सापेक्षता ती
विज्ञानात असते खरी
पण ॲडम अन् इव्हच सफरचंदच
सृष्टीचं चरम सौंदर्य असतं
नि अंतिम सत्यही!


अंतर्मन, अंतःऊर्जा,
उत्स्फुर्त विवेकाचा कारंजा असतो.
अनुभवाच्या लक्ष्य किरणांचं इंद्रधनुष्य
असतं नव्या क्षितिजाचा आपसूक लागलेला शोध.
तिथंच असतो मैत्रीचा पैस
आणि मोकळेपणाचा स्पेसही!

जगणं म्हणजे मनस्वी गाणं
आकांक्षापुढती आकाश ठेंगणं होणं
मनासारखं जग नि जगणं लाभणं
म्हणजेच असतं जीवनगाणं!

■

## मी वाट पाहीन...

तुझ्या होकाराची
फोनची
तुझ्या 'स्वॉरी' म्हणण्याची
पश्चातापाची
तुझ्या एकांत संवादाची
मन मोकळं करण्याची
तुझ्या समर्पणाची
अंग सैल सोडण्याची
खोटा अबोला संपवण्याची
संक्रांत साडी नेसून यायची
भेटीवर भेटी स्वीकारण्याची
देईल ते घेण्याची
मनातलं द्वंद्व मिटायची
दृढ निश्चयाची
'आदर' प्रेम व्हायची
नकार होकार होण्याची
नैतिकतेची कल्पना बदलायची
हातात हात देण्याची
तुझी कळी खुलायची
अन् गालावरचा तीळ तुटायची



तुझ्या चहाच्या आर्जवाची
परत मॅकडोनाल्डला भेटायची
तुझ्या संगतीत
न संपणारा प्रवास करायची
सँट्रोतल्या त्या सुखद सहवासाची
‘अरे’ म्हणत हितगुजायची
‘स्वीट ड्रीम’ शुभेच्छांची
तुझा स्त्री हट्ट संपण्याची
ग्रीष्मात वसंत फुलण्याची
मोनोपॉजनंतरच्या बहराची
सर्वा सर्वांची
मी वाट पाहीन...

■

## नकार तरंग

तुझा प्रत्येक नकार
एक कविता घेऊन जन्मलो
जखम करतो जिव्हारी
सपासप वार अंतरी!

तुझा प्रत्येक नकार
एक लाईट वेट जोक
छेद कुठे अंतरी?

तुझा प्रत्येक नकार
होकार व्हावा म्हणून
मी बदललो खेळी
तुझा मात्र ठरलेला खेळ
अळी मिळी गुपचिळी

स्वीकार नाही
अहेर नाही
नकार ही नाहीच नाही,
निकराच्या क्षणी मात्र ठरलेलं
मौन! स्वीच ऑफ! कट!

■

## तू

आज होळी
आपण भेटलो सकाळी सकाळी
प्रथमच तू इतके इतके रंग उधळलेस
की तुला मी रंग लावायलाच विसरलो

आज तुझा मुड काही औरच होता
आली तेव्हा चेहरा टाकून होती
थांबलीस अन मैफल बदलून गेली

आज कधी नव्हे ती
तू इतकी जवळ होतीस
तन
मन
भाव
विचार
कृती
सान्निध्य
सहवास
सर्वात महत्त्वाचं म्हणजे
तू माझी असण्याची जाणीव एहसास

आज मी प्रथमच तुला
आतून बाहेरून पाहिलं

मनाच्या खिडकीतून
तूही प्रथमच
होती अशी मुक्तकंठ अन् मुक्तद्वार
अन् खरंतर मनमुक्त, मनमुराद
तू अशीच असावी
रहावी
बोलावी
हसावी
रुसावी
पण असावी.

■

## कळीची पहिली पाकळी

आज कळीची पाकळी
उमलताना पाहिली
अनुभवली
अन नरपुंगवाचा
तो आत्ममग्न
घोंगाव ही
ऐकला, अनुभवला

काय असतं हे सारं?
बर्षा सरी झडवाच
नाचू लागतात मोर
अन् मनुष्य मनात
रती गुंजारव!

वीज-धरती
ढग-पाऊस
सूर्य-चंद्र
फेर काळाचा
की कळीचा
की अंतर्मनातील
नग्न-निसर्ग

हुंकार मात्र
एक पावलाचा

सरीत हरित धरती
क्षणात कायाकल्प
निसर्गाचंच
प्रति बिंबन
अन् अनुकरणही

भाव-भावना
तरंग-सारंग
लय, ताल, गती
गुंग गुंग मती

माणसाच्या जीवनाचे
सारे फेर
निसर्ग चक्र असते
मनुष्य कितीही बलवान
अन् बुद्धिवान तो खरा
पण निसर्ग, काल,
साऱ्या गतिचक्रात अडकलेला
अभिमन्यु, अश्वत्थामा,
कर्ण-कृष्ण
सीता-द्रौपदी
अन् दिल्लीच्या हमरस्त्यावर
भोगून फेकलेली अनामिका
मेणबत्या पेटवून
माणसाची मशाल
नसते होत
आणि गर्दीत गर्दी करणारे
क्षणिक संवेदी
नसतात क्रांती आणत

अण्णा, बाबा,
अरविंद-अरविंदो
पोत, वाण आपले-आपले
त्यांच्या येण्याने
नि जाण्याने
नसतात होत परिवर्तनं
फक्त रस्त्याचं वळण बदलतं
तेही तीस अंशातच
लघुकोनी

काटकोनी परिवर्तनात
त्रिजेचा नसतो छेद
अन् दुभंग रेषा सरळसोट

बदल, परिवर्तन
माणसातील, निसर्गातील
असतात
क्रिया प्रतिक्रिया
ध्वनी प्रतिध्वनी
सावध ऐकत
जे टाकलात पाऊल
फुकत, जपत
त्यांच्या गाठी, कंठी
यश अभय!

कळीची पहिली पाकळी
पावसाची पहिली सर
आमावस्येनंतरची प्रथम कोर
सूर्योदयांचा पहिला किरण
सारे सारे असतात
प्रथमोत्सव
परिवर्तनाचे
गतिचक्र पाळणारे

■

## नको भेटणे तर...

बोलणे नको
नको गुंतून रहाणे
गुदमरून जगणे
नको

तुला वाट मोकळी
मला माझा श्वास
नको मृगजळी ध्यास
न संपणारी प्यास

तुला तुझा संसार लखलाभ
मला माझा
आता आणखी जिव्हारी
जखमा नको

सहा वर्षे, सहा ऋतू
किती खोखो नि हुतूतू
नको नवे प्रयोग
ओढेवेढे नि आवंढे

नको नकार वळणे
थुंकी झेलणे नको
धरणे, मनधरणे
नकोच नको

मी माझा राजा
तू तुझी राणी
आटेल वैतरणी
तेव्हा कदाचित
कळेल खरे प्रेम राणी

चुकीचे लिहिले पान की
पुस्तक वाया
पुन्हा नको रियाझ
सोडलेला

मस्तकी अहंकार
की खोट्या पवित्र्याचा टेंभा
मन वाहिले की एकदा
पदराची सावरासावरी नको

मी अलमस्त असतो उभा
सन्यस्त जोगी-योगी
अनुभवतो तुझी
अस्वस्थता पश्चातापी

एक चूक अहंकारी
पश्चात्ताप जन्मांतरी
झोपमोडीचा आजन्म शाप!

गरूड तुला करायचे होते
चिमणीचा हट्ट तुझा
मी आकाश देतो म्हणालो होतो
तुला उंबऱ्याची लक्ष्मणरेषाच प्यारी

माणसं क्षमता असून
पंख छाटून घेत राहतात
स्वतःच स्वतःचे
पंचनामे लिहितात

गायक व्हायचा गळा असता
गळेकाढू सूत्रसंचालन
तेच तुझ्या लेखी
अनुलंघनीय सीमोल्लंघन!

■

## मी माझं एवढंच जग

ती हरीण सदैव सावध,
पारध मी तरी सावज

सारी नाती स्वतःसाठी,
नको दुरावा दुसऱ्यासाठी

मी माझं एवढंच जग,
दुसरं कोणी नको माझं

हवं सर्व माझ्या शर्तीवर,
मी मिळवायचं माझ्या शर्थीवर,

नको दुरावा संवाद हवा
सहवासाबरोबर दुरावाही हवा?

■

## क्षणिका

तू कवी मनाची स्वामिनी
मम हृदय अर्धांगी
गुंतता हृदय हे
शांत तळे खळबळे

शोधात मला गवसला सोनहिरा
कुठे ठेवू हा न आटणारा झरा

तू प्रेमात गोड
मी समजू शकतो
पण रागात तितकीच गोड
ना कळे

तू एक गूढा
न सुटणारं कोडं
प्रेमात हे काय गडे
खडे, कडे सतत चढे
न थांबणे गडे
गड नक्की सरे

आता कशाला उद्याची बात
आजन्म आपली जीवनगाठ

■

## तुझ्याभोवती

तुझ्या सहवासात कसे
सारे हरवते
भान, चित्त
सैराट, भैराट
किल्ली गाडीला
बॅलेट भुईला
सारे कसे विसरले
अनाथपणा सरते, विरते
चित्त फक्त
तुझ्या भोवती फिरते
फिरते, फिरते.

■

## तू एकंदरीत झोपमोडच!

एकंदर तू झोपमोडच!
त्रास देतेस तेव्हा
झोपमोड
सुखावतेस
तेव्हाही झोपमोड.
असतेस तेव्हाही,
अन नसतेस तेव्हाही

तुझं
बोलणं
हसणं
रुसणं
मुरका
कटाक्ष
फोन घेणं
करणं, न करणं
न येणं, केला तेव्हा न घेणं
सारं झोपमोड

तुझ्या झोपमोडीची कारणं अनेक...
पत्र येणं, न येणं

एसएसएस येणं, न येणं
भेटणं, न भेटणं
बोलणं, अबोला धरणं
फोटो देणं, परत करणं
आणि परत केलेला परत मागणंही
येऊन भांडणं, मूड खराब करणं अन् नुसतं बसून राहणं.
मुद्दाम सांगितलेलं मुद्दाम न करणं
अन् न सांगायचं ते हटकून सांगणं

सौंदर्य प्रसाधने,
दागिने, रंगरंगोटी,
पोषाख, अपोषाख
उभार, उतार,
खाचा खोचाही!
उसासे, सुस्कारे
रोमँटिक मूड,
सेंट, नेलपेंट, क्रीम, लिपस्टिक, डिओ
फेअर अँड लव्हली असतं
त्या साऱ्यांमुळेच खरं तर!

हलणं डुलणं लुकलुकणं
टकटक टकमक धकधक
अन् निरव सन्नाटाही
एकंदरीत झोपमोडच.

■

## दमदारांचे युग

सुमारांची सद्दी सरल्यावर
नि सूज उतरल्यावर
दमदारांचे युग येईल

जात, धर्म, वंश, घराणे
हे सारे किराणे खटाटोप
एक दिवस अस्त होतील

खणखणीत बंदे रुपयेच
चालतील बाजारात
तेव्हा नकली नोटा संपतील

अहो रूपं, असे ध्वनी
मीच तुझ्या ध्यानी मनी
जातीचे दाखले रद्द होतील

माणूसपणाची कसरत
इथे-तिथे सर्वत्र
'अत्त दीप भवो' ब्रीद होईल

■

## सावधान

भाडोत्री सभागृहातील भाड्याच्याच खुर्चीवर
नरभक्षकाच्या वळचणीत लपलेला
एक भाडा मला म्हणाला
या शबनममध्ये असते काय?
विनोबा, जयप्रकाश, अतिरथी-महारथी
गळी घालतात बॅगा अशा.

त्या बिचाऱ्या ठावे काय?
युगच हे सामान्यांचे
असामान्य इथे पडतात थिटे.

या शबनममध्ये असतात
लक्तरे नागव्यांची
जात्याच जे दिगम्बर
लक्तरलज्जेची महत्ता त्यास ठावे काय?


भाडखाऊ साला!
उन्मत्तांचे तळवे चाटत
पददलिता झाडीत लाथा
त्यातच त्यास वाटे
आपला उन्नत माथा.

त्या बिचाऱ्या ठावे काय
उगवणारा प्रत्येक सूर्य,
चंद्रोदयात मावळत असतो.
आजचा चंद्रच
सूर्य उद्याचा होत असतो.
अंगी ल्यालेला कृष्णकोट
अर्धांगिनी संगे मिरवण्या
त्या बिचाऱ्या ठावे काय?
काळा डगला लेऊन
तो गोरे असल्याचा बहाणा असतो करत.

हे काळे डगलेवाले
असतात सर्वच क्षेत्री
शाळा, गिरणी आणि कचेरीतही.

एवढ्यात झाले
'शुभमंगल सावधान'
मनी म्हणालो
या सुंभ अमंगळापासून सावधान!

■



## वृथा धाक

माणसा!
धाक वृथा दाखवू नको,
पिंड नाही जो आपला
धिंड त्याची काढू नको,
धाक वृथा दाखवू नको ।।धृ।।

अंतर्मनी जे रुचतचि नाही,
रीऽ तयाचि ओढू नको,
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।।१।।

करायचे ते करीत रहा
चिन्ता वृथा वाहू नको,
करणे जे अशक्य
मनी चिन्ता त्याची नको
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।।२।।

पटेल ते सांगत रहा
तमा कुणाची बाळगू नको,
शिकेल तोच टिकेल
फुका उपदेश करू नको
माणसा! धाक वृथा दाखवू नको ।।३।।

■

## मोडता पाय

मोडता पाय हरघडी, हरकामी
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

उभारणाऱ्या मोडू नये
उमलणाऱ्या खुडू नये
विदित हे असून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

तू सूज्ञ, ज्ञानी तू,
व्यवहार मात्र सदैव मानी
दूधात खडा मीठाचा घालू नये,
नाउमेद कुणा करू नये.
जाणत हे असून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

बोलणे तुझे थुंकलेले चाटणे,
स्वविष्ठेचेच भक्षण करणे.
शिकूनही अडाणी
असंस्कृत नि माणसातून बहिष्कृत
हे सारे अनुभवून पदोपदी
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

असून धडधाकट, तरण्याबांड कोकरागत,
अपंग म्हणून घेतोस का?
वाचस्खलनाने मूक विचारा बनतोस का?
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

माशी शुभकार्या शिंकू नये,
आडवे मांजर दौडू नये,
संकेत हे कळून सारे
वेड्या, मोडता पाय घालतोस का?

■

## प्रकाशपुंजासाठी

प्रकाशपुत्रांना प्रकाशाची गरजच काय?
ते ठिणग्यांची भीक मागत नसतात कधी
राखेच्या ढिगाऱ्यांना

कोळसे उगाळून का कधी शलाका जन्मल्यात?
आग जन्मायची तर
आत आग असावी लागते

शेकोटी म्हणजे दावनल नव्हे,
वडवानल तर नव्हेच नव्हे,
आगीशी सोयरसुतक नसणाऱ्यांना
इंगळ काय नि राख काय?

जळते ती आग म्हणणारे नंदीबैल
विस्तव पदरात घेत नसतात
राखेच्या स्पर्श मात्राने थरारणारे हात
प्रकाशपुत्रांना सलाम करण्याचे धाडस करत नसतात.

प्रकाशपुंजांचे वावडे असणारे शरीर,
मानसिक मुडदुसाने गलितगात्र असते,
राखेच्या ढिगाऱ्यागत
पाण्याच्या हपक्यापूर्वीच
मनाचा धसका त्यांनी घेतलेला असतो
प्रकाशपुंजासाठी.

■

## हे त्यांना कसे उमजणार

नाकर्तेच ते,
नामुष्की आपुली लपवायची म्हणून
दरवाजा लोटायचा वेंधळेपणा नेहमीच करत आलेत ते.
पण
जगाला दार लागत नसतं
नि कुलुप ही,
हे त्यांना कसे उमजणार?

बशा बैल होऊन
रवंथ करणे सोपे असते
चोथा चघळून रस तर सोडाच
लाळ तीही थेंबभर
टपकत नसते
हे त्यांना कसे उमजणारं

कावळ्यांच्या शाळेतून
एखाद्यास वाळीत टाकणे सोपे असते
डोकी मोजणाऱ्या लोकशाहीत,
बिनडोकांची सरशी नेहमीच होते.
कावळ्यास बहिष्कृत केल्याच्या भ्रमाने,
कोंबड्याचे आरवणे थांबत नसते.
सूर्यास दडवणे सोपे का असते?
हे त्यांना कसे उमजणार?

■

## भविष्याची शपथ

जन्मतः जे असतात
वंचित, उपेक्षित नि शापितही
उत्सवांच्या मांडवांखालून
त्यांनी जायचं नसतं!
गावकुसाबाहेरील वस्तीगत
हेटाळणीच त्यांनी कुरवाळायची असते!

आतिषबाजी, मेजवानी, शोभायात्रेचा
हक्क त्यांना कुणी दिला?
चार भिंती नि गजाआड
हाताची घडी व तोंडावर बोट ठेवत
सोनेरी बालपण त्यांनी गमवायचं असतं!

वंचित असल्याचा शाप भोगत
अहिल्येची हेटाळणी
त्यांनी सहन करायची असते!
उज्ज्वल भविष्याची शपथ म्हणून!

■

## हत्ती आणि मुंगीची गोष्ट

काही दिवसांपूर्वीची गोष्ट :
ते घोळक्यांनी यायचे,
माणसं नि गाड्या आडवायचे,
दमात घेऊन वर्गणी उकळायचे
आपण ती निमूटपणे द्यायचो,
ब्र नाही काढायचो
विचारायचोही नाही,
कशाची म्हणून,
कधी हिशोबही नाही विचारला
आणखी काही दिवसानंतरची गोष्ट :

त्या वसूल करणाऱ्या फाळकूट दादांचे
चौका-चौकात बोर्ड झळकू लागले
लार्जर दॅन लाईफ...
ग्रुप कॉर्नर-कॉर्नरवर जमू लागले
सहली, पाट्या रोजच्याच
कधी-कधी दमऽमारोऽदऽऽमही!
मरू दे तिकडे
आपल्याला काय त्याचं म्हणून
आपण चक्क तोंड फिरवायचो
थोड्या दिवसांपूर्वीची गोष्ट :

कॉर्नरच्या ग्रुप्सनी गल्लीत
प्रवेश केला अन्
चौका-चौकात नंग्या तलवारी
तळपू लागल्या.
लाठ्या-काठ्या, चेन्स, स्टिक्स, स्टंप्स,
साऱ्यांचा खच पडू लागला.
डोकी त्यांचीच फुटायची
म्हणून आपण त्यात ना डोकं घातलं
ना डोकावलं, ना नाक खुपसलं.
काल-परवाचीच गोष्ट :

त्यापैकी एकानं
माझ्या मित्राचं अपहरण केलं
चक्क खंडणी मागितली
एकुलता एक म्हणून
बापानं गुमाऽन देऊन टाकली
कालचीच गोष्ट :

त्यांनी खुद्द पोलीस चौकीतच
हैदोस घातला...
अण्णा... दादांची फोनाफोनी झाली,
फौज निमूट सुटून आली.
मटण-बिर्याणीचे हंडे पोहोचू लागले
पोलीस अन् गुंड मिळून
सहभोजन करू लागले.
हद्दपार, तडीपार, मटकेवाले
पोलीसांच्याच टू व्हिलरवर
सर्रास फिरूही लागले
तरीही आपण
आळी-मिळी गुप चिळी
मला काय त्याचं

म्हणून पुन्हा निमूटच
आणि मग आज :

त्यांची मस्ती, मग्रुरी इतकी वाढलीय...
घर, दुकाने, गाळे गिळत
ते चक्क माझ्याच घरी दाखल
बऱ्या बोलानं सांगेल ते ऐकलं तर बरं
नाही तर माझ्याशी गाठ आहे म्हणाले.
ऐकलं नाही तर
बघून घेतोही म्हटले
मी मान डोलवत गप्पच.
मग ते रोजच घरी देऊन धमकावू लागले...
म्हाताऱ्याचा गळा घोटीन
तरण्या-ताठ्या पोरीला डोळा लावीन
हात पाय कलम करीन
बायकोचं कुंकू पुसीन
एक ना दोन
रोज नव्या धमक्या
तरी मी गप्पच
पुढे निनावी फोन
खोट्या-नाट्या तक्रारी
अश्लिल क्लिपिंगज्ही मोबाइल्सवर.
अन् घाण-घाण एस्एमएस्सुद्धा!
आता मात्र माझा संयम संपला... सुटला
मी विचार करू लागलो.

मार्ग शोधू लागलो.
अन् लक्षात आलं
ते पाचच आहेत
पण संघटित.
आपण एकशे पाच
तरी असंघटित

एक दिवस हिय्या केला.
बळ एकवटून जाब विचारला
तसे ते हबकले
गोष्ट आठवली...
मुंगी हत्तीच्या कानात शिरली.
तसा हत्ती गारद झाला
केल्याने होत आहे रे,
आधी केलेचि पाहिजे
महात्मा गांधी आठवले
'अत्याचार करणाऱ्यापेक्षा
तो सहन करणारा अपराधी.'

■

## रस्ते

रस्ते,
शेती, वस्तीकडे जाणारे पायवाटेचे
दूर मामाच्या गावी नेणारे गाडीचे
धुरांच्या रेषा हवेत काढणारे
नि काळवंडलेले

रस्ते,
खडीचे, मुरुमाचे
खाचखळग्यांचे
काँक्रीट, डांबरी
आणि आता पळणारे रबरी

रस्ते,
ओढणारे
घुटमळणारे
रुखरुखणारे
व तुटलेले

रस्ते,
कुशीत घेऊन गोंजारणारे
ऊनातही ऊब देणारे

कधी येशीवर टांगणारे
उद्ध्वस्त धर्मशाळेचे

रस्ते,
हिरवाईने नटलेले वनराईचे
फळा-फुलांनी डवरलेले
वृक्ष-वेलींनी झाकलेले, सुकलेले
ऊन सावली खेळणारे

रस्ते,
दिव्यांनी लखलखणारे नेकलेस
मखमली शेल्यांनी सळसळणारे
चंदेरी, सोनेरी अन् सुगंधी
मिठाई वर्खांनी झळाळणारे

रस्ते,
अरुंद गल्ली-बोळातले
मध्यवस्तीत सुवर्ण-चतुर्भुजी
जवळचे, लांबचे, खुश्कीचे
आणिक अंधार-आडोशाचे

रस्ते,
चढणारे, उताराचे,
डोंगर-दऱ्यातून वळसे घेणारे
शिखरावरून जमिनीवरील तारांगण दाखवणारे
जमीनीवर आणणारे

रस्ते,
ओळखीचे, पायाखालचे,
वाट चुकलेले
पत्ता शोधत हरवलेले
आणि अचानक सापडलेले

रस्ते,
चटके देणारे
चमक, चुणूक दाखवणारे
चटका लावणारे
चकवणारे

रस्ते,
नाकासमोर जाणारे सरळ
बुद्धिबळातील ऊंटांचे तिरके
सापशिडीचे गिळणारे, घसरवणारे
खिंडीत गाठणार

रस्ते,
धूसर धुक्यातले
निरभ्र आकाशातले
तिमिरातून तेजाकडे नेणारे
चांदणे शिंपडलेले

रस्ते,
मुलांनी बागडणारे
तारुण्यांनी ओसंडलेले
हळूच हातात हात घेणारे
वृद्ध प्राजक्ताच्या लांब सावल्यांचे

रस्ते,
मनातले, हृदयातले, गळ्यातले
रोखणारे, 'नेती' 'नेती' गुणगुणणारे,
अंतर्मनात दिवस-नि-दिवस पिंगा घालणारे
'डेड एंड' असलेले रस्ते

■

## वारकरी

वारकरी
वार करी
कधी नोहे.

वारकरी
टाळकरी
माळकरी
काळठरी
कधी नोहे

वारकरी
व्रतकरी
यात्राकरी
मात्राकरी
कधी नोहे

वारकरी
भक्ती संप्रदाय
आसक्ती संप्रदाय
कधी नोहे

तुका झालासे कळस
भजन करा सावकाश

किळस अवकाश
कधी नोहे

वारी म्हणजे येरझाऱ्या
साऱ्या अमंगळाच्या शिसाऱ्या
हिंसेला थारा,
कधी नोहे

तुका, नामदेव,
ज्ञानोबा माऊली
क्षमेची सावली
गेली कोठे?

गाथा तरंगली,
कारण तो संतसूर्य होता
तुझा अंत:सूर्य
मग का वरपांगी?

पंढरी, आळंदी,
देहू, वाखरी
विवेकाची वैखरी
विखारी कधी नोहे.

अणुरेणिया थोकडा
तुका आकाशाएवढा
मग गड्या तुझ्या गळी
क्षमेला का आवंढा?

वाल्याचा जिथे वाल्मिकी होतो
तिथे पाय घसरल्याची काय पत्रास
पदर पसरला तरी स्थितप्रज्ञ
गोष्ट अक्षम्य असते एखादी
माझीया मना
आकळे ना

तुका म्हणे तोचि संत
सोशी जगाचे आघात
आनंद डोही!

■

## झाड नि माणूस

पूर्वी झाडं कशी डेरेदार असायची.
घट्ट मुळे रुतलेली,
अन् सुदुर पसरलेली.
झाडं तोडू म्हटलं तरी नाही तुटायची.
कुणी तोडू लागलं तर
जमिनीला हुंदका यायचा.
सोट मूळ इतकं खोल असायचं
कोयता, कुऱ्हाडीचं पातं बोथट व्हायचं
पण मूळ मात्र अतूट.

आता अशी झाडं राहिलीत तरी कुठं?
एकतर ती इतकी
वर्षानुवर्षे वाढू दिली जात नाहीत.
जगतात, वाढतात तोवर
रस्ते रुंद होऊ पाहतात
झाडे पसरण्यापूर्वीच
पसार होतात

फुलं, फळं पूर्वी तपानं यायची
आता तर ती, हाताच्या बोटांच्या वर्षावर
शिवाय हाती येणारी
टी. डी. संकरित (Tall and Dwarf)

ताड, ताठ, नाही कणा पण.
फुलं घमघमत नाहीत
कवठी चाफ्यागत.
गंधच नाही
तर दरवळणार कशी?

फळं बिन बियांची
अन् चव
अम्मळ बेचवच.
त्यापेक्षा फवाऱ्याची उग्रता वरचढ
धुतली तर
हातांचीच लाही

माणसंही तशीच
सारी हॅपी बर्थ डे पुरती
सामोसा गरम असेपर्यंत
नि आईस्क्रिम विरघळे तोवर

येतात ढग भरभरून
यावेत तसे
पण बरसतात कमीच,
भुंकतात मात्र अधिक
हात भरून आणतात,
अन् खिसे रिकामे करून जातात

चर्चा काय ग्लोबल
झोपतात डबल बेडवर
सिंगल होऊन
तोंडं परस्पराविरुद्ध
तरी बरं
दार लागलेली असतात.
मोबाईल सर्वांचे सुरू
जगभर संवाद तरी

घरी मात्र अळी-मिळी-गुप-चिळी.
हा पिसारा
की पसारा?
विकास की
विध्वंस हा?

सारे एकत्र
तरी एकटे
यु. पी. ए. काय
अन् एन. डी. ए. काय
डी. एन. ए. कुणाचा नाही हाती
एंजोग्राफ साऱ्यांचे पुसट
निदान होत नाही म्हणून
एंजोप्लास्टी

आताशा मी बिया खोवायच्याच
सोडलंय...
पूर्वी छंद होता घननिळा
वर्षभर साठवायचो, वाळवायचो
पेरायचो अन् चक्क पाणीही घालायचो

मग नर्सरी आली
अन् नर्सऱ्या ही गल्ली-बोळातून,
कॉलनी, उपनगरातून.
रोप नर्सरीतले...
बाळ अनाथाश्रमातलं

ॲडॉप्शन, इमिटेशन
सारा झटपट बाजार
न्यायला वेळ कुणाला?
आवराआवरीची धांदल
शाई वाळायची नाही उसंत

चक्क काटकोनी कोपऱ्याकडे
'मी' नि 'माझं'
आत्ममग्न, आत्मरत समाधीस्थ जीवन

झाड पाऊणशे वर्षांचं असलं तरी
हृदय पुनर्रोपण होणारं असावं
घरी परस नसला तरी
वृद्धाश्रम, प्ले स्कूल असलेच पाहिजे

परस्परपूरक
परस्परविरुद्ध
सार एकाच वेळी हवं

मला समाधान आहे,
'मी' असल्याचं.
ग्लोबल कम लोकल.

■

## एका नामवंत मृत्युच्या निमित्ताने

त्या नामवंत मृत्युची
ती शोकवार्ता
क्षणार्धात सोसाट्यानं
येऊन थडकत होती...

एस. एम. एस,
इंटरनेट,
प्रिंटमिडिया,
चॅनल्स,
नि कर्णोपकर्णीही!

एक नामवंत निवर्तले तेव्हा
शोकाची किंचितही छटा
कुणाच्या चेहऱ्यावर नव्हती

वृत्तपत्रांच्या श्रद्धांजलीत
चॅनल्सच्या बाईटस्मध्ये
इंटरनेटच्या ब्लॉगवर
अग्रलेखात नि वृत्तविशेषमध्येही

तिचा सारा पसारा
म्हणजे शब्दकळा होती
गळा भरून होता हुंदका

मला तरी ऐकूच नाही आला कुठे
नि अश्रूंचा अनावर पाझरही दिसला नाही कुठे

मी मोबाइल स्वीच ऑफ करून
सुन्न मनाने
त्या कविता, ते लघुनिबंध,
अनुवाद नि समीक्षा वाचत राहिलो.
अन् कळालं की
ग्रंथालयातून ही पुस्तकं
अपवादात्मक वाचकांनी
अपघातानेच नेली होती

नाही म्हणायला
चार-दोन अधोरेखितं भेटली त्यातही
तीच खरी त्या नामवंत मृत्युची
मृत्युंजयी दाद होती...
बाकी सारा तो दिवस साजरा करायचा
उत्सव होता!

नामवंत मृत्युची शोकवार्ता
रकाने भरण्याची एक रिकामी जागा असते...
चॅनल्सच्या वार्तापत्रातील एक ठळक मथळा असते...
नेटवर ट्विस्टरचा एक चाळा असते...

गळा भरून आलेला हुंदका जेव्हा कुणा ऐकू येईल
तेव्हा समजा
तो खरा नामवंत मृत्यू होता
अन्यथा तो एक केवळ नाशवंत होता म्हणून समजा!

■

## अधिष्ठान

जिवंतपणीच इतक्या आरत्या
झाल्या ओवाळून,
आता आरती उठवायचीही
नाही गरज राहिली तशी

पुरस्कार, शाबासकी म्हणाल तर भरपूर!
हार, प्रहारही तितकेच।

जग चांगल्याचं,
तसंच करंट्याचंही,
पण तुम्हाला सांगतो
चांगलेच वरकड!

उद्योगही अनेक
लोक त्याला नसती उठाठेव
म्हणत असले तरी
माझ्या लेखी ते
एक एक वीट रचणेच होते

आयुष्य नाही वाया गेलं
जे गेलं त्यात
धन्य मी... कृतार्थ मी

मुद्रा नसली माझी,
वा संस्था, मठ, प्रतिष्ठान.
माझं जगणं,
हेच माझं अधिष्ठान

■

## एफ. आय. आर.

होय,
त्यांनी सामूहिक बलात्कार केला तेव्हा
मी होते गलितगात्र नि हतबलही!

पोलीस ठाण्यात
एफ. आय. आर. दाखल करायला गेले तेव्हा
कॉंस्टेबल स्टेबल होऊन विचारतो कसा
आय विटनेस काय?
मी म्हटलं
तुझी आय, दुसरं काय?

आता माय नव्हती अन मावशीही
बापूही गाव सोडून गेले होते
काळं तोंड दावायला नको
अन् दिसायलाही!

आता मी होते आधारगृहाची लाभार्थी
बलात्कारित, बदफैली, नासकौडी
फळून पळालेले नामानिराळे दुष्यन्त
होते समाजसेवक अन् समाजभूषणही!
उगवते नेतृत्व फुलत होते...
अशाच जुन्या समर्थ साथींनी

मला होती काळ कोठडी
त्यांना मुक्तदार, पाटलाचा माळ
मी वनवासी,
त्यांना रोज नवा सहवास.
'वाह रे न्याय'
अबलांना न धुणारा कलंक
त्यांना मात्र बोनाफाईड निष्कलंक

आताशा मी
पुरुष पोसू लागले हाय...
वळू पोसतात तसे.
पंटर मी म्हणतील त्याचा
सँडवीच करतात अन्
किडनॅपही!
आता भले भले
माझ्या बोटावर नाचतात
इसारा द्या... घसारा घ्या.
आताशा तो काँस्टेबलही येतो
काहीसा अनस्टेबल होऊन
थ्री स्टारवालं सायब घेऊन

आताशा वडील बी येते झालेत
वाइच वंगाळ घेऊन गेले
माय बी आली
पोरी असं करू नगं म्हटली

आता तुम्हीच सांगा
असं वागू नको
तर कसं?

■

## रस्ते होणाऽऽर

वर्तमानपत्रात बातमी
‘नगरोत्थान योजनेतून रस्ते होणार’
घराच्या समोरचे,
परसातले,
गल्ली बोळातले
रस्ते होणार चकाचक!

माझ्या घरासमोरचा
वर्षानुवर्षे शापित रस्ता हरखला
कायाकल्प, अहिल्या उद्धार होणाऽऽर!

मी ही बातमी
अक्षरशः सादवली
घरोघरी दवंडी पिटली
रस्ते होणार होऽऽ होणारऽऽर!

मुलं, सुना, बायको,
शेजारी, पाजारी, दुकानदार,
भांडीवाली, धुणीवाली, केरवाली,
झाडूवाली सर्वासर्वांना बातमी कळली
इतकेच काय
नातवांच्यापण कानी-मनी

बातमी पडली, अडकली
रस्ते होणाऽऽर!

मुलं खूश
त्यांना केव्हाची चारचाकी घ्यायची होती.
सुना खूश
त्यांना टू व्हिलरचा मुहूर्त एकदासा सापडला
बायको खूश
नवऱ्यावर अवलंबून वरात एकदाची संपली.
भांडीवाली खूश
दारावरून बस सुरू होणार
नातू खूश
हात सोडून सुसाट सायकल चालणार

एकदाचं टेंडर प्रकाशित झालं खरं!
सर्व्हेवाले लेव्हल घेऊ लागले
झेंडे, शिटबोर्ड, कुली, ओव्हरसियर
लगबग साऱ्यांची सुरू झाली
खात्री रस्त्याची मनी ठसली
रस्ता होणाऽऽर!

जेसीबी, डोझर, रोलर
साऱ्यांचा खडखडाट
डंपरची घरघर
घरोघरी एकच धूम
रस्ता होणाऽऽर!

रस्ता झाला
काळा-पांढरा
तांबडा-पांढरा रस्ता जसा
मग लक्षात आलं
अर्रच्या ड्रेनेज लाइन टाकायची होती
पाण्याचे नळ वळवायचे होते
युटिलिटी शिफ्टिंगची युटिलिटीच विसरली.

परत आले
जेसीबी राक्षस
दैत्य डंपर
गंधर्व डोझर
आणि माया-मैना हरखली
रस्ते होणाऽऽर
परत परत रस्ते होणाऽऽर
नगरोत्थान होणारच होणाऽऽर!

वर्तमान पत्रात बातम्या...
नगरोत्थान की नगरसेवक उत्थान?
नगर विकास की मंत्री विकास?
ठेकेदाराची चंदी की पैशाची मंदी?
सारा गोमगाला, चोरीचा मामला
जरा हळू बोंबला!

रस्त्यावर मी रोज
पाटी वाचतो
'काम चालू रस्ता बंद'
काम खरंच चालू असतं रोज?
केलेला रस्ता उकरायचा
कधी लेव्हल चुकली म्हणून
तर कधी पाईपची गळती म्हणून
काम रोज चालू असतं
फक्त रस्ता बंद असतो.

मजूर, मुकादम, ओव्हरसियर, इंजिनिअर, ठेकेदार
रोज दिसतात रस्त्यावर
जेसीबी, डंपर, माती, मुरूम,
साऱ्यांची ओतणी, पसरणी, भरणी
असते सुरू दिवसेंदिवस
अहोरात्र, अष्टौप्रहर
काम सुरू असतं

फक्त बंद असतो रस्ता.
वर्तमानपत्रात परत बातमी
ठेकेदार काम सोडून पळाला
आता रिटेंडरिंग होणार
कारभार कसा पारदर्शी
पुनर्तरतूद होणार
गेल्यावर्षी डीपीडीसी निधीतून खर्च
यावर्षी आमदार, खासदार निधीतून
तरी रस्ते नाही झाले
तर पुढीलवर्षी खास राज्य तरतूदीतून
तरी रस्ते होणाऽऽर म्हणजे होणाऽऽर!

आता वर्तमान पत्रात बातम्याच नसतात
वर्तमानपत्र असतात कशी चकाचक
न झालेल्या रस्त्यागत!

■

## तत्त्व आणि तिलांजली

खुर्ची प्यारी खरी
पद, सत्व, मत्ता
आणखी थोडी हवी आहे.
संचार बंदी बेहत्तर
इथे स्मशान शांतता अटळ आहे

मागच्या दाराने आलो असलो जरी
ऐरावतावर आरुढ आहोत
ऐटीत झुलण्यातच
आम्हास स्वारस्य आहे.
वादळाच्या शक्यतेनेही
वाळूत मान खुपसणारे
आम्ही बहाद्दर शहामृग
समुद्र गाज ऐकूच आली नाही म्हणून
भ्रमात खूश आहोत.
बुद्धीशी आमचे देणे-घेणे नाही
तिच्याशी काडीमोड
खुर्ची बळकावतानाच
आम्ही घेतला होता.
(किंबहुना खुर्ची बळकावली
त्याच इराद्याने होती!)

तद्दन सारे महापुरुष आम्ही
जातीय स्वार्थाच्या चौकटीत
बंदिस्त केलेत आज
उद्याच्या स्वार्थासाठी
आता आम्ही
त्यांना फुरसतीने
(अन् खर सांगायचं तर
अंमल अक्कल हुशारीनेच!)
प्रोजेक्ट करतो त्यांना
आमची दुकानदारी चालावी म्हणून

आम्ही सांगू तो इतिहास
आखू तो भूगोल
म्हणेल तो कायदा
आमचा जातीय वायदा
आमची म्हणून नवी लोकशाही आहे
ठोकशाहीच्या स्तंभावर ती उभी
पाऊल टाकाल तर खबरदार
ही आमची प्रायव्हेट प्रॉपर्टी आहे
अन् 'पोलिटिकल सेझ, पण!

सांस्कृतिक दहशतवाद आमचा अजेंडा
बालवाडीपासून विद्यापीठापर्यंत
इथं तिथं सर्वत्र
वर्तमानपत्रात अन् चॅनल्सवरही
आताशा आम्हीच असतो
इव्हेंट मॅनेजमेंट एक्सपर्ट
दगड, काच, खच आमचाच
बाईटस् ही असतात आमचेच!

आता उद्याच्या सर्वच पडद्यावर
अन् वर्तमानपत्राच्या
प्रत्येक सेंटीमिटरमध्ये
आम्हीच तुम्हाला दिसू
तत्त्वांना पूर्ण तिलांजली मिळेपर्यंत.

■

## मी अनाथ, तू सनाथ

आज ही येत राहतात
एकामागून एक
वॉट्सअ‍ॅपचे बीप
अन् येत राहतात
एस्एम्एस्चे बीटस्

कधी काळी येणाऱ्या
याच बीपची काय प्रतीक्षा असायची
जीच घेणी प्रतीक्षा ती
जीन टांगणीला लावायची

तुझे चॅटस् 'ते'
इतक्या दूरवरूनही
रोमांचित करत राहायचे
शहारायचं तन, मन
थरारायचं शरीर

तुझ्या त्या शब्दांत
नसायचे नुसते भाव वेडे
जीव गुंतवणारी ती असायची
सय अन् जीवनलय, लहर

किती रात्री जागवल्यात आपण
घरच्यांचा डोळा चुकवून
दिवे मालवून
नि तोंडावर पांघरुण घेऊन
'तू सप्तपदी घातल्यापासून
नि मेण्यातून निघून गेल्यापासूनही
तो घोड्यावरून आलेला
तुझ्या स्वप्नांचा राजकुमार
भासतो भेसूर
उर कसे उसासे भरतो
तुला काय कळणार?
मगरमिठीत मग्न
इकडची सारी स्वप्नं भंग!

आता नसतं उठल्या उठल्या
'गुड मॉर्निंग'
नि झोपताना
'गुड नाईट'

डीपी कसे शृंगारलेले
भासताल अव्हेरलेले
माणसं बदलतात हेच खरं
रंगमंच बदलला
की अभिनय बदलतो
नि ओंठा-तोंडाची लाली-लीलाही

लीलया माणसं विसरतात
भूतकाळ
वादे, इरादे, वचन, व्यवहार
भविष्याचा वेध
गतकाल वेधत
विस्मरणांचं ग्रहण घट्ट

ते चॅटस्‌चे बीपस्
आताही येतच आहेत
नि एसएमएसचे बीटस् पण
पण आता त्यात ती जान नाही,
आन, मान, नाही

असतात ते परक्यांचे सांगावे
सांगाड्यांनी सांगाड्यांने कवटाळावेत जसे
ते बीपस, बीटस्
नाही रिझवत पहिल्यावत
खिजवतात गमावल्या स्मृती

रक्त साकाळलेलं
हृदय विदीर्ण विस्तीर्ण
मी असा एकटा, अनाथ
तू मात्र नाथ सनाथ

■


## पुस्तकांच्या कविता

१.
पुस्तक नसतात
नुसती कागदांची चवड
असतात ती
जीवनाची सवड
निवडून आवड
ती भरतात
जीवन कावड

२.
पुस्तकात भेटतात
विरामचिन्हे
इथे तिथे सर्वत्र
स्वल्पविराम
असते विश्रांती खरी
नसतो पूर्ण विराम कधी
तो नेहमी बजावत असतो
थांबला तो संपला
म्हणून तर माणूस
एकामागून एक नवी-जुनी
पुस्तकं वेचित वाचत असतो.

३.
पुस्तके
मौन
पण बोलकी
निर्जीव
तरी सजीव
तटस्थ
प्रसंगी हस्तक्षेपी
पुस्तके
अस्वस्थ
ज्वालामुखी
ज्वालाग्रही
शांत
संयमी
योगी
महंत
म्हणून शहाणी माणसं
पुस्तके मन:पूर्वक वाचतात,
विचार करतात
कृती मात्र संयमाने,
सबुरीने
म्हणून किती तरी आगी
लागण्यापूर्वी निवळल्या
निमाल्या
भूमिगत अग्नीमुळेच
जग शांत, अहिंसक, संयमी
नि सभ्यही पुस्तकांमुळेच.

४.
वारंवार आठवणारी पुस्तके
वारंवार वाचली जाणारी पुस्तके



चिंध्या झालेली पुस्तके
परत न येणारी पुस्तके
अस्वस्थ करणारी पुस्तके
अंतर्मुख करणारी पुस्तके
ललित, मनोहर पुस्तके
अभिजात पुस्तके

५.
पुस्तकांना नसते जात,
नसतो धर्म, पंथ,
असतो विचार केवळ
असतो आशय, अर्थ
माणसं मात्र
आपापल्या सोयीने
लावतात पुस्तकांचा अर्थ,
करतात अर्थाचा अनर्थ
तेव्हा
होतात बदनाम पुस्तके
हकनाक...

६.
तू रुसलीस तेव्हा
मी पुस्तक घेऊन आलो
कळी खुलली
गाठ सुटली.

मी आजारी पडलो तेव्हा
तुझ्या 'त्या' पुस्तकाने
मला बरे केले

पुस्तके काही
न लिहिताही वाचता येतात

पुस्तके डोळ्यात भरलेली असतात
नि श्वासात गुंतलेली
पुस्तके गुंतागुंत असते
कधी सोडवणूकही

पुस्तके चक्रव्यूह
आत जाणं सहज,
बाहेर पडणं
अशक्य

पुस्तके व्यसन, चटक
खाये तो पछताये,
न खाये तो भी

७.
पुस्तकं गातात
पुस्तक हितगुज करतात
पुस्तकं समजावतात
पुस्तकं साथ-संगत, सोबत
सर्व सर्व करतात
म्हणून कधी कधी वाटतं
जायचंच झालं कधी
पुस्तकांसोबत जावं
सरणाशेजारी देखील
रचली जावीत पुस्तकं
गोवऱ्या जळत राहतील तिकडे
इकडे मात्र पुस्तके
उजळलेली!
रक्षाविसर्जनं दिनी
पणती नका ठेवू
ठेवा नंदादीप पुस्तकांचा
निरंतर उजळणारा!

८.
पुस्तके दृष्टी
पुस्तके सृष्टी
पुस्तके व्यष्टी
पुस्तके समष्टी

कठीण समय येता
हात देतात पुस्तके
बोट धरूनही
बुडणाऱ्यांस वाचवतात पुस्तके
घर पेटेल तेव्हा
पुस्तके स्वतःसही पेटवून घेतात
कठीण समयी
हात देतात
फक्त पुस्तके!

■

## न उजेडणारा अंधार

आता नको लपंडाव
ऊन-पाऊस
खोखो, हुतुतूही नको
नको मृगजळ
होकार, नकार
माझा मी
मी माझाच बरा

माणसं असतात मतलबी
सोयीनं वापरतात सर्वांना
नि बदलतात दिलेले शब्द
चाटतात थुंकी,

कृतज्ञ होऊन पेरत गेलो
पार्क कृतघ्नतेचे दाट, अपार
गळी पडू नये कुणाच्या
नि मदती येऊ नये
कळते पण वळत नाही
वृत्ती, स्वभाव बदलत नाही

माझ्यात उपजत दोष
मनस्वीपणाचा

जग निबर इतके
रबर होऊन
जबर मी जगतो

कुणालाच नाही कसा पाझर?
समाज परदुःख शीतल कसा?
हवे आपणास सर्वांचे हात
आपण बोट नाही द्यायचे कसे
हाताची घडी, तोंडावर बोट
अळीमिळी गूपचिळी
जगतात, सारे कसे दातखिळी?

जग असेच चालणार तर
न्यायाचा सूर्य उगवेल एक दिवस
मला भीती नि दुःख एकच
न उजेडणारा अंधार
दाटला असेल तेव्हा आसमंती

सूर्य उगवेलही
पण अंधारलेलं जग
प्रकाश वैराची भीष्म प्रतिज्ञा घेऊन
उभे कसे ते कृतसंकल्प!


■

## मी कर्फ्यू पुकारलाय माझ्याभोवती

मी आताशा कर्फ्यू पुकारलाय
माझ्याच भोवती.
आसमंत असा सारा उतावीळ
व्यक्त होण्यास हपापलेला
नि मी मात्र निश्चिंत!
किटलीतलं उकळतं पाणी
वाफ दौडून आपोआप थंडावलंय
तसं तापलेली जर्मनी किटली
वितळून ओबडधोबड,

मला फेसबुक,व्हॉटस्‌ॲप,
ट्विटस्, इन्स्टाग्राम
ग्रॅमभरही नाही खुणावत
इतके ते गर्दीत गुरफटलेले
आणि गुदमरलेले पहातो तेव्हा
माणसांची रोजची फरफट
नि फसवाफसवी येते अंगावर

लोक आताशी बोलत नाहीत,
भेटत नाहीत
येत-जात नाहीत
तरी असतात जीवाभावाचे कसे
तेच कळत नाही



हाय!
हॅलो!!
काँग्रॅटस!!!
सहवेदना!!!!
संवेदना !!!!!
सारं कसं मूक, स्तब्ध
सोशल कर्फ्यूच!

फार स्पष्ट हायचं तर
इमोजीतूनच!
म्हणजे असून नसल्यासारखं
आणि नसून असल्यासारखंच ना?

चुंबनऽ
रडणंऽऽ
हसणंऽऽऽ
सारं चित्रमय आभासी
माझ्या आसमंतात
अघोषित उदासी

मी सान्त, एकान्त
भरलेल्या जगात
सुखान्त नि शोकान्त एकाच वेळी
मी हल्ली पुरेपूर
खबरदारी घेतो...
निमंत्रणं सारी व्हॉटस्ॲप, ई-मेलवर
पटापट नि फटापट
माझे सारे जीवलगही
तितकेच तत्पर
ऑनलाईन सत्वर
शुभेच्छा, श्रद्धांजली
बुके, प्रेझेंटस्, आभारही!
प्रेझेंटमध्ये नसताना

सर्व असतात वर्तमान, जिवंत
ते हे सारं लाइक करतात की
ठेंगा दाखवतात कळत नाही

म्हणून मी आताशा
कर्फ्यू पुकारलाय
माझ्याच भोवती.
ते आहे माझ्या लेखी नि भाळी
प्रखर वास्तव
आभासी जगातून शोधून काढलेलं
माझ्यापुरतं उत्तर!

■

## गोची

आज माझ्यातल्या पशूनं
उच्छाद मांडलाय कसा

कळतं पण वळत नाही
काय करायचं याचं?

या कोड्यानं मला
निर्लज्ज बनवलय निर्लज्ज।

कोण असतो मोठा!
पशू की माणूस?

पशू श्रेष्ठ
तो मरत नाही,
अन माणूस म्हणून
जगता येत नाही

माणूस एक गोची आहे खरी!


■

## वात्सल्य वृक्षाखाली

या वात्सल्य वृक्षाखाली,
होऊ दे, अनाथ सनाथ सारे
परिवर्तनाचे हे वारे
पेटवू देत धुमारे जगी सारे

अनाथ, निराधार, अनौरस सारी
उकिरड्यावरची लेकरे ही
उंबरठ्यावरी येऊ द्या
या वात्सल्य वृक्षाखाली
सनाथ त्यांना होऊ द्या


■



‘खाली जमीन वर आकाश’ या बहुचर्चित आत्मकथनाचे लेखक सुनीलकुमार लवटे यांनी कविता हा प्रकारही अतिशय निष्ठेने हाताळला आहे. पन्नास-पंचावन्न वर्षांपासून अधिक इतका प्रदीर्घ काळ कविता या प्रकारातून लवटे यांना अभिव्यक्त व्हावेसे वाटणे ही निश्चितच दखलपात्र अशी गोष्ट आहे.

अनाथाश्रम आणि रिमांड होमधील ‘हाताची घडी तोंडावर बोट’ अशा ‘मोकळपणा’ हिरावून घेणाऱ्या दबावव्यवस्थेत लवटे यांची जडणघडण झाली आहे. भय, कुंठा, संकोच या गोष्टींची किनार असलेले एक खास अनुभवविश्व त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित झाले आहे. ‘हाताची घडी तोंडावर बोट’ हे लवटे यांच्या निवडक कवितांचे संपादन आहे. या कवितेतला ‘मी’ स्वतःच्या आयुष्याकडे पाहतो, तेव्हा त्या पाहण्याला इतरांच्याही जगण्याचा संदर्भ असतो. हा मी समष्टीला सामावून घेणारा, समष्टीपासून अलग न होऊ शकणारा असा आहे. ‘अनाथ’पणाचे पराकोटीचे दुःख भोगूनही जगण्यावर विलक्षण श्रद्धा ठेवणारी सरळ, साधी, सोपी अशी ही कविता आहे.

– रफीक सूरज



अक्षर दालन